साल अखेर " ७ ... १८
किरकोळ अंकास.....................८४

नोटिशी बदल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ०।८६
दुसरे खेपेस ........०।१

Six monthly............ 3 " 8 as
Single copy............................ 4 as

Advertisements.
Below 10 lines...2Rs
Per line over 10...4as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERARSAMACHAR.

VOLXX AKOLA MONDAY 12 JULY 1886 NO 27

पुस्तक २० अकोला सोमवार तारीख १२ माहे जुलई सन १८८६ इ० अंक २७

नोटीस.

पंजाब नादारी मुकद्दमा नंबर ११.
सन १८८६ इ०

नमुना. ( जी. )

विद्यमान नादारी कोर्ट जिल्हा अकोलें यांचे कोर्टांतून सर्व लोकांस प्रसिद्ध करण्या साठीं कळविण्यांत येतें कीं, काशीराम वल्लद नानजीमाळी आडनांव राऊत राहणार नामोद तालुके जळगांव हा नादार आहे असा आज तारखेस ठराव जाहला आहे आणि ता० २९ माहे जुलाई सन १८८६ हा दिवस नादाराच्या सावकारांनीं जमण्याकरता आणि सावकारांनीं आपल्या तर्फे असामी नेमून देण्याकारिता व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं या बद्दल आठ आण्याचे ष्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आधार आणि त्याजबद्दल ज्यास साक्षीसमक्ष करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांची नांवें दाखल करावीं. ही नोटीस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस पूर्वीं तरी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्याकरितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड रींतीनें ठेविल्यां आहेत. ज्या नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे ष्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे आहेत बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें सही केली असावी.

२ जे सावकार दूरचे रहाणारे असतील त्यांणीं आठ आण्याच्या ष्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या ज्युडिशियल आफिसरापुढें तिच्या खेरपणा विषयीं शपतलिहावी. आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी म्हणजे ते दावे रजिष्टर दाखल होतील. ता. ९।७।८६ इ०

By order.
Damoder Nanaji.
जड्ज

नोटीस.

राजमान्य राजश्री हिरालाल देवीदास मुदंड मारवाडी दुकान वाशीम याजला खालीं सही करणार पुरणमल इनानी मारवाडी तामसीकर दुकान बाशीम याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुम्ही आमचे नांवें एक दस्ताऐवज तारीख १० माहे मे सन १८८६ इसवीचा रंगराय यांचे हातानें लिहून ठेविला आहे, त्या दस्ताऐवजांत जी जी स्थावर मिळकत लिहून ठेविली आहे. ती आमचे ताब्यांत द्यावी. असें तावेगाहाणखत लिहिले आहे. दस्ताऐवजांत लिहिलेल्या जमिनी दुसरे असामी कडेस वहितीस आहेत त्या लोकांच्या कबुलायती आमचे नांवें करून दिल्या वाचून आमचा ताबा आहे असें दस्ताऐवजा वरून मानिलें जाणार नाहीं. व असा अपुरा दस्ताऐवज असल्यानें आमच्या उपयोगीं नाहीं. सबब दस्ताऐवजाचे शर्तीं प्रमाणें तुम्हास वागणें असेल तर वहीतदार लोकांच्या कबुलायती आमचें नांवें ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसात करून द्याव्या. व दस्ताऐवज नोंदून आणून द्यावा म्हणजे दस्ताऐवज पुरा केला असें समजलें जाईल. नंतर त्या दस्ताऐवजांतील शर्तीं कबूल केल्या जातील. असें न केल्यास दस्ताऐवज परत घेऊन जावें. आम्हास असा अपुरा दस्ताऐवज कबूल नाहीं. कळावें ता० ६।७।८६ इ०

( सही ) पुरणमल इनानी
मारवाडी तामसकिर
साहु दुकान वाशीम.

वऱ्हाडसमाचार

मित्ती आषाढ शुद्ध ११ शके १८०८

## राज्य व्यवस्थे प्रकर्णी हक्क मिळविण्याविषयीं एतद्देशीय लोकांचे प्रयत्न आणि त्यासंबंधीं आपमतलबी आणि परोत्कर्षासहिष्णु परदेशस्थ लोकांची ओरड.

( २३ वे अंकावरून पुढें चालूं. )

आमचा उद्देश सिद्धीस गेला मग मिनिस्टऱ्या आणि फिनिस्टऱ्या यांच्या भानगडींत पडण्याचें आम्हाला कारण काय? कोणतीकां विग्यारी मिनिस्टरी असेना. आम्हाला वागविण्याच्या रीतीनें वागविलें म्हणजे झालें. तुम्हाकरितां आमच्या तर्फेची आयरीश लोकांप्रमाणें पार्लमेंटांत मंडळीं नाहीं. कशावरून हो. कोणत्या तर्कशास्त्राने ती आशा आम्हाला नाहीं अशी युक्ती आपण काढलीत. टाईम्स किंवा स्पेक्टेटर यांनीं केलेल्या रिपोर्टाला तुम्ही भुलून गेलात होय? डोळे उघडून नीट पहा. दम धरा कालेंकरून आमच्या तर्फे ऐरीश लोकांपेक्षांही बलवान् अशी मंडळी पार्लमेंटांत आमच्या तर्फेची निघेल. हल्लीं देखील आमच्या डेलिगेटांनीं केलेला पराक्रम हलका समजूं नका. थोड्याच दिवसांत ऐरिश लोकांच्या पक्षापेक्षाही अधिक योग्यतेचे व वजनदार गृहस्थ आमचा पक्ष उचलण्याला पुढें येतील. त्याकालिन साहेबांच्या पत्रांवरूनच आर्ध्या हळकुंडानें पिंवळे होऊं नका.

पायेनियरचें आणखी म्हणणें असें आहे कीं, " यालोकांनीं योजिल्या प्रमाणें अशा साधनांच्या योगानें हिंदुस्थानांत तर फारच त्रास होईल. सर्व देशभर चळवळ होऊन जाईल येवढ्या करितां प्रथम हे अशी योजना करून ठेवतील कीं वेळ आल्या बरोबर तावड तोब सर्व देशभर गोंधळ होऊन जावा याच कामाकारितां ते जागो जाग राज प्रकरणीं व देशस्थिती प्रकरणी विषयांचा विचार करण्या कारितां मंडळ्या स्थापन करीत आहेत व अनक प्रकारची निमित्तें काढून पैसा गोळा करीत आहेत. "

या म्हणण्यांत सत्यतेचा जरी थोडासा अंश आहे तथापि एकंदरीत त्यांत अर्थ कांहींच नाहीं. आमच्या लोकांत जागोंजाग मंडळ्यास्थापन झाल्या आहेत व पुढेंही होतील हीगोष्ट आम्ही मुळींच लपऊन ठेवीत नाहीं. पायोनीयर साहेबांच्या देशांत ज्या प्रमाणें एखादे वेळीं लोकांची माथी फिरून जागोजाग गुप्त समाज स्थापन होऊन राज्यकर्त्यांच्या किंवा राज्य सूत्रें ज्यांच्या हातांत आहेत अशा प्रधानांच्या कधीं कधीं प्राणावरही येऊन बेततें, त्या प्रमाणें आमच्या देशांतील लोकाचे मुळींच प्रयत्न नाहींत. सरड्याची धांव कुंपणा पर्यंत म्हणतात त्याप्रमाणें आमची धांव फार तर पार्लमेंट पर्यंतच जावयाची आतां तेथेंच जर आम्हाला थारा मिळनासा झाला तर निरूपायच झाला. असो. पायोनीयर साहेब म्हणतात त्या प्रमाणें मंडळ्या आमच्या लोकांत स्थापन झाल्या आहेत खऱ्या. परंतु त्यास्थापन झाल्या त्या वेळीं त्यांना अस्तित्वांत आणणाऱ्यांचा उद्देश केवळ देशांत चळवळ उत्पन्न करावी किंवा लोकांचीं मनें बदलवून त्यांनीं गडबड उडवून द्यावी असा मुळींच नव्हता अशा प्रकारचा उद्देश जर आमच्या लोकांनीं आपल्या मनांत आणला असता तर आमच्या पायोनीयर साहेबां सारखे या देशांत जे परोत्कर्षा सहिष्णु व दोषैकदृक् लोक आहेंत त्यांना हा देश केव्हांच नकोसा होऊन गेला असतां आमच्या पायोनीयर साहेबांची दृष्टी आतां दिवसें दिवस वृद्ध होत चालली असल्या कारणानें त्यांनां या देशांत जरा कांहीं चळवळ झाली कीं भलतेंच दिसूं लागतें. बरोबर आहे. ओशाळ्या मनुष्याला जराकांहीं झालें म्हणजे आपल्याला कोणी बोलले काय इत्यादि तरंग मनांत येऊन एकप्रकारची अंतस्थभीति वाटत असते. तशांतलाच प्रकार हा. पायोनीयर साहेब आपली ज्ञान दृष्टी जरा अधिक काळजीनें व विचारानें फेंकावी त्याप्रमाणें फेंकते तर आमच्या लोकांत आजपर्यंत स्थापन झालेल्या व हल्लीं स्थापित होत असलेल्या सर्व समाजांचा मूळ उद्देशकाय आहे हे तेव्हांच समजून येतें. आमच्या मतें आमच्या पुढाऱ्यांच्या मनांत असें समाज स्थापन करण्यांत दोन उद्देश आहेत. एकतर साधारण जनसमाजाला राजप्रकर्णीं विषयांचें चांगलें ज्ञान करून द्यावें व राजा आणि प्रजा यांचे परस्पर संबंध वास्तविक काय आहेत हे त्यांच्या लक्षांत आणावे. परमेश्वर कृपेनें हल्लीं आमच्या लोकांस इतर शिक्षण बरेंच मिळत आहे व त्याच्या योगानें आमच्यांत जागोजाग सुधारणाही होत चालली आहे. परंतु इंग्रजींत ज्याला पोलिटिकल एज्यूकेशन म्हणतात त्या प्रकारचें शिक्षण मिळण्यास सध्यांच्या पद्धतीप्रमाणें मुळींच मार्ग नाहीं. यद्यपि हायस्कुलें व कालेजें यांत उच्च प्रतीचे शिक्षण देतांना इतिहास, पोलिटिकल इकॉनमी वगैरे विषय शिकवितांना हा विषय देखील तदंतर्गत असल्या कारणानें येऊन जातो तथापि त्याचे वास्तविक ज्ञान फारच थोड्यांना प्राप्त झालेलें असतें. शिवाय हा विषय इतर विषयां प्रमाणें केवळ ग्रंथावलोकनानें साध्य होण्या जोगा नाहीं. याचें अध्ययन व्यवहारांत नेहमीं घडत येणाऱ्या गोष्टींचें सानुभव अवलोकन करून व त्या संबंधी झालेला वाद विवाद श्रवण करून व त्यासंबधीं मनन करूनच झालें पाहिजे. शिवाय आमच्या साधारण जनसमाजाला हल्लीं प्रमाणें शिक्षण न मिळाल्या मुळें त्यांना याविषयांची मुळीच माहिती नसते. तेव्हां अशा लोकांनां हा विषय कळण्यास वर निर्दिष्ट केलेल्या मंडळ्या शिवाय दुसरा उपायचनाहीं. हा एक उद्देश झाला. आतां दुसरा उद्देश इतका महत्वाचा जरी नाहीं तरी तोही सिद्धीस जाणें अति इष्टच आहे. मनुष्य कितीही अज्ञ व अशिक्षित असला तथापि लोकांनीं केलेला जुलूम किंवा अपमान त्याला कळून येतनाहीं असें नाहीं. त्याप्रमाणें आमच्या अशिक्षित अशा जनसमाजाला जरी राज प्रकरणीं विषयांची चांगलीसी माही नाहीं तथापि त्यावर जुलूम झाला किंवा त्यांचा कोणी अपमान केलातर तो

त्यांना लागलाच कळून येतो आपला अपमान सहन नकरणें व आपल्मावर आलेलें काचाट कोणत्यातरी उपायानें टाळणें किंवा दूरकरणें हा मनुष्य जातीचा स्वाभावीक गुण आहे.

पुढें चालूं

## रुप्याच्या नाण्याच्या किंमती.

इसवी सन १८८६ सालचे प्रारंभीं हिंदुस्थान सरकारांनीं सेक्रेटरी आफ स्टेट यांचें मार्फतीनें एक लेख इंग्लंडांतील लार्ड्स आफ दि ट्रेझरीकडे पाठविला होता. आमचे वाचकांस माहित असेलच कीं हिंदुस्थानाचें राज्य सूत्र सेक्रेटरी आफ स्टेट या नांवचा विलायतेंत अधिकारी असतो त्याचे हातीं बहुतेक असतें. इंग्लंड देशाचा राज्यकारभार चालविण्याचे दोन पक्ष आहेत एक लोकसत्ताक पक्ष व दुसरा राज्यसत्ताक पक्ष या उभय पक्षांपैकीं जो पक्ष ज्यावेळीं पार्लमेंट सभेंत ज्यास्ती सरसावला असेल त्यांपैकींच कांहीं लोक मिळून प्रधान मंडळ बनतें.त्या प्रधानांत स्टेट सेक्रेटरी फॉर इंडिया' या नांवाचा अधिकारी असतो व हिंदुस्थान संबंधीं राज्यकारभार अमूक रीतीनें चालवयाचा अशा विषयीं ठोकळ ठोकळ प्रमाणें तो वारंवार गवर्नर जनरल यांस देत असतो व कोणत्याही महत्वाच्या कामांत गवर्नर जनरल यांस त्यांचा सल्ला घेऊन त्याप्रमाणें वर्तन करावें लागतें. या नियमास अनुसरून या सालाचे आरंभीं हिंदुस्थान सरकारानें स्टेट सेक्रेटरीकडे एक खरडा पाठविला होता; त्यांतील विषय कीं हिंदुस्थानांतील नाणें रूप्याचें असल्यामुळें द्रव्य संबंधानें या देशाचें फार नुकसान होत आहे. इतर सर्व बहुतेक नामांकित देशांत सोन्याचें नाणें चालूं झाल्यामुळें सोन्याची चणचण झाली व त्याचप्रमाणानें रूप्याची अनास्था होत चालली. यामुळेंच रूप्याचें नाण्याची किंमत दिवसानुदिवस कमी कमी होत चालली; व असें झाल्यानें या देशाचें फार नुकसान होत आहे. असें हिंदुस्थान सरकारांनीं आपल्या लेखांत दर्शविलें आहे. हा प्रश्न हिंदुस्थान सरकारास फार महत्वाचा वाटल्यावरून त्यांनीं स्टेट सेक्रेटरीकडे अभिप्रायासाठीं पाठविला. या प्रश्नाचें महत्व कोणत्या कारणांनीं आहे व आज हिंदुस्थानांत या प्रश्नाचें विशेष महत्व कां आहे हें थोडक्यांत आह्मी आपले वाचकांस सादर करतों.

प्रत्येक वर्षीं हिंदुस्थान सरकारास ५० कोट रुपये उत्पन्न होतें अशी कल्पना करू.या उत्पन्नांतून दर वर्षीं इग्लंड देशांत स्टेट सेक्रेटरीच्या खर्चासाठीं सुमारें २ कोटी पौंड पाठविले पाहिजेत. अशी कल्पना करूं. या प्रमाणेंच हिंदुस्थान सरकारानें इंग्लंडांत तेथील सावकार लोकांपासून काढलेलें कर्जाचें व्याज वर्षाचे वर्षतिकडे पाठविलें पाहिजे. इतका पैसा पाठविणें तो इंग्लंडांतील सोन्याचे नाण्याचे रूपानें पाठविला पाहिजे ह्मणजे २ कोट पाउंडाचे ऐवजीं २० कोट रुपये पाठविले पाहिजेत. हा हिशोब प्रत्येक सोन्याचे पाउंडाची किंमत १० रुपये धरली ह्मणजे बरोबर जमतो. परंतु अशी स्थिति होते कीं १० रुपये हिंदुस्थानांत भरले तर विलायतेंत १ पाउंड त्याचे ऐवजीं देत नाहींत. येथें जेव्हां बारा अगर १२॥ रुपये भरवित तेव्हां विलायतेंत १ पाऊंड सोन्याचा मिळतो. ह्मणजे या मानानें इंग्लंडांत २ कोट पाउंड पाठविण्याचे असले तर हिंदुस्थानांत २० कोट रुपये भरून पुरेसें होत नाहींत. तर २५ कोट रुपये भरावें लागतात याचें कारण रूप्याचे नाण्याची किंमत नेहमी बदलते हें होय.

आतां रूप्याचे नाण्याची किंमत बदलण्याचें तरी कारण काय? त्याचें कारण असें कीं रुपें दिवसानुदिवस पुष्कळ होत चाललें सोनें कमी कमी होत चाललें ज्या प्रमाणानें वस्तु बाजारांत पुष्कळ किंवा थोडी असते त्याप्रमाणें त्याची किंमत कमी जास्ती होते हें सर्वत्रास ठाऊकच आहे. याप्रमाणें रुपें बाजारांत पुष्कळ झालें म्हणजे त्याची किंमत इतर पदार्थांसंबंधानें कमीशी दिसून येते. सन १८७४ सालीं युरोप खंडांत कांहीं देशांनीं असा ठराव केला कीं सोन्याचें नाणें चालूं करून रूप्याचें नाणें रद्द करावें असा ठराव केल्यामुळें अर्थात् तेथील रूप्याचें नाणें रद्दी होऊन ज्या देशांत रुपें खपेल तेथें ह्मणजे हिंदुस्थान सारख्या देशांत येऊं लागलें कारण हिंदुस्थानांत रूप्याचें नाणे लोक वापरतात. हा युरोपखंडांत ठराव झाल्यावरून तिकडील सर्व रुपें इकडें आलें. व तेथें सोन्याची चणचण जास्त झाली कारण तेथें सर्व नाणें सोन्याचें पाडावयाचें होतें. यामुळें त्या देशांत रूप्यास कोणी विचारी नासें झालें व त्यामुळें अर्थातच त्याची किंमत कमी झाली ह्मणजे रुपें स्वस्त झालें. रुपें स्वस्त होण्याचें हें एक कारण व दुसरें कारण हें कीं अमेरिकेंत रूप्याच्या खाणी सांपडल्या व त्या रूप्याचा पुष्कळसा खप म्हटला ह्मणजे काय तो हिंदुस्थानांतच; कारण रूप्याचें नाणें येथेंच काय तें चालणार. यामुळें युरोप खंडांतलें रुपें व अमेरिकेंतील रुपें एकदम हिंदुस्थानांत आल्यानें त्याची किंमत फार कमी झाली. आतां ज्या अर्थीं इंग्लंडांत सोन्याचें नाणें चालतें त्या अर्थीं रूप्याचे नाण्यास कोण विचारतो? अशामुळें एक सोन्याचे पाउंडाची किंमत १० रुपये न रहातां १२ किंवा १२॥ रुपये झाली म्हणजे रुपें सुमारें सव्वापट वाढलें किंवा त्याचेंच नांव रुप्यापट स्वस्त झालें. जितकें जितकें रुपें देशांत वाढत जाईल तितकी तितकी त्याची किंमत कमी होईल. रुपें दीडपट वाढलें तर एका सोन्याचे पाउंडाबद्दल १५ रुपये द्यावे लागतील. अशा रीतीनें दिवसानुदिवस रूप्याचें अगदीं मातेरें होत चाललें आहे. अशी स्थिति झाल्यामुळें हिंदुस्थान सरकारांनीं असें लिहून कळविलें कीं वर्षाचे प्रारंभीं उत्पन्ना विषयीं जें अनुमान करतों व खर्चाविषयीं जें अनुमान करतो तें सर्व व्यर्थ होतें. १ पेन्स किंमत रूप्याची कमी झाली कीं खाडदिशीं १ कोटीची तूट खर्जिन्यांत आल्याप्रमाणें आहे. ३ पेन्स कमी झाली तर ३ कोटीची तूट आल्या दाखल होते, यामुळें जें अनुमान सालाचे आरंभीं करावें तें सर्व व्यर्थ जातें. याकरितां विलायत सरकारानें ही गोष्ट मनावर धरून या गोष्टीचा पूर्णपणें विचार करावा व मुख्य मुख्य राष्ट्रांशीं असा ठराव करावा कीं जेणेंकरून रूप्याचें व सोन्याचें अशीं दोन प्रकारचीं नाणीं तीं राष्ट्रें वापरतील व असें झालें म्हणजे अर्थातच सर्व देशांत रुपें लागूं लागल्यानें रूप्याचा भाव चढेल व जितकें आज हिंदुस्थानांत बेभरवशाचें काम झालें आहे व जें आज हिंदुस्थानचें नुकसान होत आहे तें होणार नाहीं. हिंदुस्थानांत सरकारानें असें दाखविलें आहे कीं १८७२ इसवी सालापासून आजपर्यंत रूप्याची किंमत उतरत उतरत चालली आहे व इतर राष्ट्रांशीं वर सांगितल्याप्रमाणें एखादा ठराव न केल्यास खचितच जास्त उतरत जाणार आहे. हिंदुस्थानचा खर्च दिवसानुदिवस वाढत चालला आहे; म्हणजे आफगाणिस्थानच्या सरहद्दीवर रेलवे करणें व देशांत रेलवे वाढविणें ह्या गोष्टी केल्याच पाहिजेत; तसेंच रशिया पुढें सरसावत असल्यामुळें फौजेचा खर्च जास्ती वाढणारच; प्रसंगोपात लढाई झाल्यास त्याची तजवीज करणें भागच; या सर्व गोष्टी हिंदुस्थान संरक्षणासाठीं व सुधारणेंसाठीं अवश्य आहेत.या कामाकरितां कर्ज काढिलें पाहिजे.व तें इंग्लंडांत सोन्याचें नाण्यांचें कर्ज काढावयाचें; सोन्याचे नाण्याचे रूपानें कर्ज काढलें म्हणजे लाखो रुपये त्याचे प्रत्येकवर्षीं व्याज भरावें लागेल व तें व्याज देणें ते रूप्याच्या नाण्यांत द्यावयाचें तेव्हां अर्थातच हिंदुस्थानांतील प्रजेवर कराचा बोजा जास्त बसत जाणार व रूप्याच्या नाण्याची अशी वाईट स्थिति असल्यानें हा बोजा अधिकच वाढणार आहे. असा हिंदुस्थान सरकारचा खर्च पाहून स्टेट सेक्रेटरीकडून जबाब आला तो फारच चमत्कारीक आहे. हिंदुस्थान सरकारचा असा लेख गेल्यावर त्याचा पोक्त विचार करून त्याचें उत्तर पाठविण्याचें तें एकीकडे ठेवून लेखांतील उणिवा काढीत बसण्याचें पोरकट काम स्टेट सेक्रेटरी करीत बसले. एवढ्या महत्वाचे प्रश्नाचा योग्य विचार न करितां टाळाटाळ करून, उडवाउडवी करून कांहीं तरी उत्तर दिलें आहे असें स्पष्ट दिसतें. यावरून हिंदुस्थानासंबंधानें प्रश्न उत्पन्न झाला असतां काय काळजीनें त्याचा निकाल करतात याचा हा एक सुरेखसा मासला असल्यामुळें आम्ही आपले वाचकांचे माहितीसाठीं भाग दिला आहे.

अरेरे!! गरीब बिचारा धुलिपसिंग! किती तरी बिचाऱ्याचे हाल झाले असतील शेवटीं आजारी पडला व राहवेना ह्मणून मनोविकाराच्या झपाट्यांत टाइम्स आफ इंडियाला एक पत्र देखील बिचाऱ्यानें लिहिलें. कायतरी दैवाची गति विचित्र आहे पहा. कोठे महाराज रणजीतसिंग आणि कोठें महाराज धुलिपसिंग. हें पत्र इतक्या हृदय द्रावक रीतीनें लिहिलें आहे कीं कितीही पाषाण हृदयाचा मनुष्य असला तरी देखील हें वांचून त्याला कळवळा आल्या शिवाय राहणार नाहीं. आमच्या आर्य मातेचे तरी काय भाग्य. आपल्या आवडत्या पुत्रांपैकीं एकाची अशा रीतीनें दशा झालेली पाहून तिला तरी किती वाईट वाटलें असेल. बिचाऱ्याला कृत कर्माची उपरति होऊन स्वदेशांत अन्य धर्मानें येण्याची लाज वाटली व त्यामुळें पुन्हा धर्मांतर करून स्वकीय धर्माचा स्वीकार केला. इतकें ही करून त्याला पुन्हा आल्या मार्गानें परत जावें लागलें आणि तेंही वारंटासारख्या अति नीच साधनानें, प्रारब्ध बिचाऱ्याचें. जो कित्येक वर्षें सिंहाप्रमाणें गर्जत होता व ज्याला खरोखरीच परदेशस्थ लोक "धि लायन आफ पंजाब" ह्मणजे पंजाबचा सिंह असें ह्मणत असत, ज्याची गर्जना ऐकून शौर्याचा व्यर्थ अभिमान बाळगणारे अनेक परदेशस्थ लोक चळचळा कांपत असत त्याच सिंहाच्या शावकाची अशी झालेली दशा पाहून कोणाला बरें वाईट वाटणार नाहीं. असो. महाराज धुलीपसिंग यांना एडनाहून परत लाविलें यांत आमच्या सरकारानें किती योग्यपणा दाखविला आहे याबद्दल व्हावी तशी चर्चा अगोदरच होऊन गेली आहे करितां त्याबद्दल चर्वित चर्वण करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. या कृत्यांत आमच्या सरकारानें जी थोरली पोलिटीकल दूर दृष्टि दाखविली तिचा प्रकाश सर्व हिंदुस्थानांत पडला आहे. आतां, महाराज धुलीपसिंगानें आपल्या पत्रांत जे उद्गार काढिले आहेत ते त्यांच्या स्थितींतल्या मनुष्याला सहाजिकच आहेत परंतु त्यांतही विचार करून महाराजांनीं जरासा दम धरावा. कांहीं दिवसांनीं मनाला शांतता आली ह्मणजे पोक्त विचार करून हितावह दिसेल तेंच करावें. उगाच राणीच्या सपाट्यांत पत्रांत लिहिलें आहे त्याप्रमाणें उतावेळपणा करूं नये.

## The Berar Samachar

MONDAY JULY 12 1886

An interesting criminal case was brought to a close before Mr. Hiderali, Magistrate Amraoti on the 5th of July. The complainant was a Mahomedan who said that the accused women obstructed him from drawing water in a certain well. In the Indian Penal Code it would come under wrongful restraint. The accused were three public women now residing at Amraoti. As a matter of course the position of the accused created great sensation and attracted large crowds to the Court-House. The women were dressed in the gala day attire and made attraction still more inviting. The case terminated on Monday in the dismissal of the complaint. The accused were ably defended by Messrs Eknath Tatia and Janardan Shastri of whom the latter had taken the lead. He argued the case from all stand points in Marathi and to our mind quite proved the futility of the complaint. His address if it were within smaller bounds would have been faultless. It was forcible, impressive and clear. The only fault we are able to find with it is its length. Mr. Hider ali listened to it with remarkable calmness and patience and ultimately dismissed the complaint. Those who can judge say

that the decision was very sound. We found it extremely well put. The women left the court well pleased and the only man who, we believe, felt dissatisfied must have been the complainant himself.

---

We beg to call the attention of the College students to the notification of the University of Bombay in regard to the Government of India Scholarship. The candidate must be below 21 years in age and a graduate and must be willing to proceed to England in order to complete a University education. The scholarship will entitle the holder to an allowance not exceeding 200£'s per annum or nearly 2400Rs. and will be tenable for three years. His passage money to and from England will be paid by government. The scholar must remain three years in England and cannot return except on the ground of ill-health. This is a very good opportunity for our rising young men and the best of them should cast off every consideration to the good they will do to their country by obtaining a thorough proficiency in one Department. Their end and aim should be to receive such education as will develop the trade and manufactures of India. The scholarship will be awarded by the result of University examinations.

---

Sir James Furgussion has been reelected. Mr. Maclean has been elected at the head of the Poll. Babu Lal Mohun Ghose has been defeated by 600 votes. We had some chance of getting the Babu in and his failure will be received with great regret in India. Honorable Mr Dadabhai had no chance. So this opportunity too has been of no service to us in putting Indians into the Parliament. A day must come when they will get in. We need not despair; it is not an easy task. Our people should redouble their efforts next time. Mr. Gladstone was returned; his opponent Colonel Walker very probably had to walk away. We are sorry to learn that Mr. Slagg was again defeated. According to last Monday's telegrams the tories have gained 16 seats against the sixor seven gained by the Gladstone liberals.

---

The 3rd of July 1886 has become a red letter day in the annals of current history. On that day two of the principal potentates Scindia and Holker were installed on the *gadi*. A grand darbar was held at Indore and after the usual salute Maharaj Sayajirao Holker was enthroned. He then addressed the assemblage consisting of Jagirdars, Sardars and state functionaries as follows:

"It has pleased the Almighty God to call me to the throne of the Indore state. I will try my utmost to discharge faithfully the sacred trust thus reposed in me. I trust the old servants of my father will continue their support in the administration of the state. My first thoughts will be given to promote the welfare and happiness of my people. My desire is to see my younger brother who is now sitting by my side treated and respected by my people as my equal. My first act of charity is to establish on a grand scale a house for the poor and destitute in the city. My second act is the abolition *byaj, Manoti* from to day."

The Byaj Manoti was very unpopular and objectionable on principle. The new Maharaja has earned the gratitude of the people by abolishing this most iniquitous impost. Rao Bahadur Shamrao Narayen-Naib Dewan and Keshorao then received new Jagirs which they richly deserved. We wish the British Government follows the example of Native States in this particular. If as much Jahagir as the pensions were bestowed on distinguished individuals and members of high families who had to accept service and join to it the principle of primogeniture, our people would be more thankful to the government than they now are and would accept with gratitude the change to which their fore fathers were much accustomed. Telegrams were sent to congratulate Holker Sarkar by the chiefs of Jeypoor, Jodhpoor, Cashmeer, Baroda, Dorbhanga, Banares, Palithana and others. Sir Lepel Griffin will formally instal him on the Gadi on the 12th instant on behalf of the Government of India.

The installation of the Gwaliar Prince took place at about 12 also on the 3rd July in the presence of Sir Lepel Griffin. No *khillat* or *khareeta* has been received from government as yet.

---

Mr. Samuel Smith has just published his 'India Revisited.' He says that India is a continent, that what is true in one part is false in another and that what is suitable in the north is out of place for the south. He had entertained a very high notion of Indian wealth and of the indebtedness of the people to British rule but on actual facts he found that the people are getting poorer every day and are growing discontented. The average income of the people is 30Rs. a year perhead of the population according to the estimate formed by Sir Evelyn Baring. He says that the land revenue presses hardly on the people. He considers that the income tax is unsuitable to the condition of the country. He exclaims that systems of law and finance which are quite suitable for the west may become the parents of as much oppression in the East as the worst abuses of despotism. He considers India altogether unfit for direct taxation. He is in favour of the import duties which ought in his opinion to be reimposed. This is very creditable in him as he is a Lancashire merchant and therefore an interested party. Mr. Smith truely remarks 'one thing is certain. Just as public opinion becomes enlightened in India and the natives claim the share that justly belongs to them they will shape its fiscal policy in a way suited to India and not always agree able to the commercial classes in England.' According to him the chief defects of British Government are its costliness, its tendency to subordinate Indian to British interests and its exclusion of the natives from the leading and high posts. The natives want to mould British authority in a truer Indian form. Mr Smith thinks that the first reform we want is representation by election in the Legislative councils. For that matter the Town Councils may in his opinion be utilized as an electoral body. He considers that the Indian Universities ought to be represented in the House of Commons. The Times of India of 3rd July from which we have drawn the above summary may be referred to for a longer artical on the subject.

---

The education of their chiefs can not be a matter of indifference to the people of India. The Bombay Government have lately published a Resolution on the subject. The Principal of the Rajcumar College at Rajkote proposed that there should be two colleges one for the Northern chiefs and the other for the Southern but the Bombay Government are of opinion that experience does not appear to support the idea that there is material sufficient to fill a chiefs college in the south as well as in the North. We also believe that one college is quite sufficient to supply the wants of our noblemen and Rajas. What is wanted is a stimulus to join the institution. The education must necessarily be adapted to their status and position but whatever it is it should be sound. Again it is generally the practice for young men to become giddy by contact with Europeans and European ideas. Every attempt should be made to instil into the minds of chiefs the lesson that native things are not to be discarded because they are native; some amongst them are very useful. And it should always be remembered that a thing has intrinsic value regardless of class or creed This principle should never be left out of sight by men who have after a few years to rule states. The total number of young chiefs now receiving education is 47 in the Bombay Presidency. In 1873 and 1874 the sons of first class chiefs paid each Rupees 200 per mensem as college fee, the second class Rupees 150 and others Rupees 100 or Rupees 50 according to rank. The minimum amount of private expenses excluding the fee was said to be Rs. 250. These figures show that none but the wealthiest can join the Rajcumar College and Government need not be in any fears that the middle class of people will spend beyond their means. If any rich merchant wishes to bring up his son amidst princes and chiefs we believe he should be allowed to do so. Whoever can command such high comfort and society ought to be able to enjoy it. We agree with the Bombay Government that it is un fair that the students from states out side Kattyair should pay less than the actual cost of their education. It is gratifying to see that the account of the conduct and progress of the students is favourable, and that the athletic exercises of the College have not been my neglected Colonel Phillips of the 2nd Bombay Lancers admitted the College troops to be drilled on parade with his own regiment and thereby endeared himself to the young chiefs.

---

We beg to acknowledge with thanks the receipt of the following:

1 Act No. X of 1886, to amend the code of Civil Procedure and other acts.

2 Act No. V11 of 1886, to amend the Registration act.

3 The Births, deaths, and marriages Registration Act, 1886.

4 The guardian and Wards Bill. 1886.

5 The Indian Bankruptcy Bill 1886.

---

## वऱ्हाड.

हवामान—नेहमीं आकाश ढगानें भरलेलें असतें. मधून मधून पावसाच्या थोड्या थोड्या सरी येतात, कपाशी, नवारी, यांचीं पेरणीचीं कामें संपत आली आहेत. रोगराई ह्मणण्या सारखी नाहीं.

मे० स्पान्स्की साहेब बहादूर डि. क. यांची स्वारी तारीख १४ रोजीं परत येऊन बुल्ढाणें येथील डि. कमिशनरचे कामाचा चार्ज घेतील. व मे. नेकोल्ट साहेब डि. क. बुलढाणा हे ३ महिन्यांच्या रजेवर जाणार असें आह्मांस समजतें.

मे. सानिटरी कमिशनर साहेब बहादूर यांची स्वारी गेल्या आठवड्यांत सानिटेशनचें काम पाहण्या करितां आले आहेत.

रा. रा. निलकंठ नारायण भट डे. ए. इ. जि० वाशीम हे गेल्या आठवड्यांत किरकोळ ९ दिवसांची रजा घेऊन येथें आले आहेत.

मूर्तीजापूर येथें एका संन्याशानें एका सोनाराच्या पोरीशी लग्न लाविलें होतें त्याबद्दल मुलीच्या बापानें डि. क. साहेब यांचेकडे फिर्याद केली होती, त्याचा निकाल गेल्या आठड्यांत असा झाला कीं संन्याशी बोवांनीं चांगल्या वर्तणुकीचा जामीन द्यावा न दिल्यास त्यानें ६ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा भोगावी. जामीन न दिल्यामुळें संन्याशी बोवा जेलांत शिक्षा भोगीत आहेत.

उमरावतीस एक मोठा टोलेजंग बंगला बांधून त्यांत वऱ्हाडांतील सर्व खात्यांच्या मुख्याधिकाऱ्यांची आफिसें आणावयाचीं असें गेल्या आठवड्यांत ठरून ती टोलेजंग इमारत कोणच्या जागीं बांधावयाची ती जागाही पसंत करण्यांत आली.

मे० डायरेक्टर साहेब यांची स्वारी सदरील आफिसाची जागा पसंत करण्याकरितां गेल्या आठवड्यांत उमरावतीस गेली होती.

रा. रा. आत्माराम भिकाजी हे लवकरच पेनशन घेणार आहेत असें पक्के आधारावरून कळतें.

एथील वऱ्हाड ट्रेडींग कंपनीचे दुकानांतून सुमारे शे दोनशे रूपयांचा उंची माल नाहींसा झाल्याचें कळतें. ह्या दुकानावर देखरेख करणारे, व रोजचेरोज हिशेब तपासणारे व मालाची झडती घेणारे व ह्या कामाबद्दल कमिशन घेणारे सुमारें खंडीभर माणसे असतां वर लिहीलेली गोष्ट घडली याचे आह्मास आश्चर्य वाटतें.

---

## वर्तमानसार

निजाम सरकारचा हल्लींचे दिवाण काढून टाकण्या बद्दल आग्रह असल्यास हैदराबादेतील मनुष्यास ती जागा देण्याची व्हाइसराय साहेब मंजुरी देणार नाहींत असें त्यांनीं रेसिडेंट मार्फत [illegible] कारास कळविलें आहे. [illegible] हिंदुस्थानाच्या [illegible] दिली आहे तर ती निझामाच्या [illegible] कदाचित इष्ट असेल राच्या बाबतींत दिल्लीचे सरकारास ती पुन्हा आहे. लागेल ही, परंतु यावरून रिपनचे त्यावेळचें करणें चुकीचें होतें.

admit the justice and policy of upholding it, we fail to see that it ought to be allowed to interfere with the working of the state educational machinery for which the people pay a special rate. If when the people have just begun to avail themselves of the schools established by Government, their children were to be driven away by imposition of prohibitive fees, and informed to fall back upon their indigenous *Pantogis* Government schools should not have been opened at all, and the people should not have been compelled to contribute towards their expenses. But having done so and while the people are made to pay the education cess, the government cannot, we should think, with justice sanction higher rates of fees with the express intention of driving away the children of the people from the Government schools. If this happens it will amount to encouragement to indigenous instruction by vengeance and we hope the responsible authorities will see the absurdity and impolicy as well as injustice of the measure emanated, we are constrained to say from over-zeal somewhere.

We know that there prevailed once a cry against the high education. Then a cry was raised for *Mass* education. We are not quite unaware that the present fashion is to talk of *Indigenous* education. We are however unacquainted with any express orders of Government requiring encouragement to the Indigenous education at the sacrifice of state education. No doubt the former is to be encouraged, but it should be remembered that it need not be at the expense of the latter. There certainly does not seem any antagonism existing between them. Both have different spheres and both may go on in their respective grooves without clashing with each other unless disturbed by mischievous interference. The dream of making the people educate themselves by means devised and conducted by themselves will be a pretty distant one, and one need not be in indecent hurry to undo, in the mean-while, what little is being done in the matter of popular education generally.

We cannot believe that it could be the intention of our Government to sacrifice Government schools particularly of lower order for the benefit of the Indigenous schools. It would be opposed to their own express policy and promises and fair dealing. The matter should not be viewed from a mere mercenary point of view. It should not be forgotten that the people pay a special levy and that some consideration is deserved by them for that. It is possible that the Government may wish to see the higher education made gradually self supporting, and we leave it to their own disoretion to do what may seem to them proper. If we have not entirely misunderstood the question we believe that our Government is very anxious to encourage the primary education or instruction, as you may choose to call it whether it be through the departmental institutions or Indigenous schools. If there has been really any such proposal put foth by the Director of Public Instruction as we have been informed he has, we do not feel quite sure that checking or even suppressing the attendance at the Government schools will lead to the increase of the Indigenous schools. There are many other reasons besides difference in the rates of fees why the Indigenous schools are not so well attended as the Government institutions. If it be supposed that the existence of the Government scools checks the growth of the Indigenous schools, how is the existence of schools of both the kirds in the same locality to be accounted for? It is we believe generally true that the Indigenous schools charge heavier fees than those charged in the Government schools, and it is alleged that because the latter are cheaper the people resort to it and the Indigenous are put at disadvantage in the race. But the fact of the existence of both kinds of schools in the same localities does not support the theory. The explanation muat be sought elsewhere. We do not think that raising the fees in the Government schools will check the attendance of the Government scdools to any appreciable degree. The people are just beginning to see the difference in the kind of instruction imparted to them. Does the Director of Public Instruction believe that thousands of boys go to Government schools in place of hundreds that attended the Indigenous institutions before the Educational department was created in this province simply because the Government schools take lighter fees? We do not think so. It is the growing appreciation and sense of the necessity in these days of educatien on the part of the people, combined with their superiority to the Indigenous institutions that fills the Government schools. That inefficient but costly Indigenous schools should still exist in places where efficient but cheap schools are available, must be accounted for the supposition that there are yet people who cannot distinguish a bad from a good school. That Government schools are superior to the Indigenous schools will be readily admitted by all sensible persons and to expect that people will exchange the former for the latter, simply to save a few pices, is something like counting without the host. We cannot do him the injustice to think that the Director could not be aware of this. Perhaps he wants to show a large revenue from fees, If so he should not have proposed the increase in the name of the Indigenous schools but in his own.

We certainly think that the proposal, whatever it may heve originated from, is ill advised and injudicious and we had almost said unjust under the present circumstances of the educational department and hope that the Resident will not sanction it.

---

Washington Irving has given in his sketch book the character of the English people. He states that when self-interest is absent the English Nation is the most just and sensible nation in the world. We have realised this fact to our cost and are realising it every day. The circumstance which has called our attention to it now is the expense of the Indian Branch of the Indo. Colonial Exhibition. Now everybody will candidly admit that to call upon India to pay the expenses of the Indian Court is extremely absurd, selfish and indecent. England gets up an Exhibition for her own interest and calls upon India to pay up the cost of a part of it! It is like the story of the Tiger and the kid where the tiger when he could find no reasonable excuse for killing it turned upon it by sayng that it must suffer for the sins of its father. This was an imaginary excuse and we could give the suggestion of burdening India with the expense no higher value. Indeed we read that the Secretary of State has sanctioned 10,000 £s for the purpose. We cannot too strongly condemn such an undignified course and only hope that the report proves false.

---

The roads within the city of Amraoti appear to have been studiously neglected. Moorum has been used to repair them but it is spread so carelessly that you meet with ups and downs at every step. We hear Raosaheb Sadasheo Narayen was entrusted with the superintendence. His absence from Amraoti during the vacation but much more the unskilfulness of the men placed under him has to account for it; for we cannot consider our amiable Rao-Saheb, whose zeal and devotion to Municipal work is exceptional, could be blamed for it. What is he to do if the Municipal servants placed under his charge are unable to follow up the directions given to them from time to time? But who ever is to blame it will be readily admitted that the state of roads within the city does not do credit to the municipality of Berar head-quarters. We don't know the reason but we find that the people of Amraoti dont take much interest in municipal matters; perhaps they don't take any. Men like Raosaheb Sadasheo Narayen are really an exception and they have laid people of the city under the greatest obligations by their unremitting interest in local affairs. Perhaps the blame lies with the educated classes whose indifference is reflected in the ordinary people. Unless the intelligent section takes the lead, the Commoners are not expected to follow. As a proof of our statement we beg to refer to the so called monster meeting assembled at Amraoti to make suggestions in the new Municipal act. The Sub-Committee completed its labours long ago; but the printing and signing of the document has taken such a long time that people seem to forget whether there was any movement at all in that direction. What is the President of the public meeting and the Secretary doing? In a place which professes to be the capital of Berars such a state of things is deplorable. We had thought that four L L-Bs, half a dozen English knowing and a dozen Marathi Pleaders was a great professional strength to originate and carry on schemes of general public utility but experience reads a very disappointing lesson. The school masters, clerks and other gentlemen who have had education is another class. But if the former class is so *energetic* what is to be said of the latter? Everybody appears to be so engrossed in his duties that public affairs are allowed to rot and a doubt is created as to the capacity of educated men in India for co-operation in disinterested and independent matters. We hope the Amraoti men are soon up and doing.

---

चुकीची दुरुस्ती— मागील अंकी ज्या ठिकाणी बदून असें पडले आहे सा- ठिकाणी क्लार्क आफधी कोर्ट असे समजावे.

---

## वऱ्हाड.

हवामान— पावसानें पुरेंपुरें करून सोडलें आहे. १९ दिवस उघाडी देइल तर बरें होईल. या पावसानें पूरयेऊन गांवातील व पेठेतील अदमासे ३०,००० रुपयांचें नुकसान झालें या बद्दलची हकीकत दुसरीकडे दिली आहे. रोगराई लक्षण्यासारखी नाहीं.

हैस्कूलांची वार्षिक परीक्षा तारीख ११ आक्टोबर पासून सुरू होणार आहे. व ट्रेनिंग कॉलिजची वार्षिक परीक्षा तारीख १८ अक्टोबर पासून सुरूं होणार आहे असें कळतें.

एज्युकेशनल कॉन फरन्स आकोलें येथें तारीख ३ नोवेंबर रोजीं भरणार आहे. आणि हैस्कूल व ट्रेनिंग कॉलज यांची प्रवेश परीक्षा नोव्हेंबर महिन्यांत सुरूं होणार आहे असें समजतें.

मे. स्यानिटरी कमिशनर साहेब मागील आठवडाभर येथें राहून कालरोजीं खामगावीं गेले. ता० १४ रोजीं ते शहर सफाई पाहण्या करितां गांवांत व पेठेंत फिरले तेव्हां शहरची व्यवस्था पाहून त्यांनीं आपला संतोष प्रदर्शित केला असें कळतें.

आह्मास असें समजतें कीं रा. रा. त्रिंबक गणेश यांस इलिचपुरास व त्याचे जागीं ज्युडिशिअल कमिशनरचे कचेरींतील डेप्युटी क्लार्कचे जागेवर रा. रा. हरीहर काशीनाथ यांस कायम केलें. परंतु चमत्कार येवढाच आहे कीं उमरावती स्मालकाज कोर्टाचे जागेवर सबप्रोटेमकाम करीत असलेले मि. पांडुरंग सखाराम यांस या वर्गावर्गींत अद्याप कायम केलें नाहीं व यामुळें रा. रा. पांडुरंग सखाराम यांच्या ज्यु. कमिशनरचे कचेरींतील जागेवर काम करीत असलेले रा. रा. त्रिंबक नारायण तारे यांसही अर्थांत कायम केलें नाहीं. वरील दोन असामीस कायम केल्यावर अर्थांत खालच्या दोन जागेवरील गृहस्थांसही कायम करावयाचें पण तें कां तहकूब राहिलें हें समजत नाहीं. कांहीं पॉलिसी तर नाहींना?

अकोला व हिंगोलीचे दरम्यान जी रेल्वे लाईन होणार होती. ती मे. ग्लास साहेब बहादूर सु० ई० प्रांत वऱ्हाड व इलाख्याचे सरकारचे सेक्रेटरी यांनीं नापसंत केल्यामुळें असा ठराव झाला आहे कीं तें काम तूर्त सुरूं न करितां ज्या काळीं कधीं दुष्काळ वगैरेची अडचण येईल तेव्हां सुरूं करावें यामुळें तें अनियमत मुदतीवर पडलें गेलें. असें आह्मांस कळतें.

डाबकी कडून अकोल्यास एक कुणबी आपल्या बायकोसह येत असतां बैलगाडीतून पाण्याच्या लोंढ्यांत सांपडून गाडी बैलासुद्धां मरण पावला. व याच प्रमाणें आकोटासही खाई नदीस अती पूर येऊन पुष्कळ घरें पडलीं व पुष्कळ नुकसान झालें. कमेटीच्या कारणानं तही कांहीं काटकसर

---

वर्तम

हिंदुस्थानच्या राज्यकारभारामध्यें नमेस आणि खर्चास मेळ घालणें हें जितकें कठिण आहे, तितकें एकही काम कठिण नाहीं. कारण प्रसंगोपात खर्चाचे मान उलटें वाढतें; व वेळ पडेल तसें वागावें लागतें. कारण हिंदुस्थानाच्या संबंधानें ह्या गोष्टी कधींही मर्यादित व्हावयाच्या नाहींत ह्याचीं कारणें अनेक आहेत. अबीसीनी याशी लढाई, अफगाणिस्थानाशीं लढाई ब्रह्मदेशाशीं लढाई, अबदुल रहिमानाशी व्हाइसरायांची मुलाखतझाली, तिचाखर्च, व परवां नुकती लटकी लढाई जी दिल्ली येथें झाली, ती पाहण्या करितां, युरोपांतल्या मोठ्या राष्ट्रांचे जे सेनापति आले होते, त्यांचा व इंडियन आणि कालोनियल प्रदर्शनचा खर्च आणि आतां मि. मेकाले साहेब मोठ्या थाट माटानें तिबेटा कडे जात आहेत त्याचा खर्च, शिवाय चांगलें से कांहीं जमलें नाहीं जर चिनाशीं युद्ध करण्याचा प्रसंग आला, तर त्या खर्चाची धाड हिंदुस्थानावरच यावयाची ह्या खर्चाच्या संबंधानें मोठें लचांड असें आहे कीं, खर्च कमी करण्याचा विचार ज्या लोकांच्या हातीं दिला आहे त्यांचाच व त्यांच्या जातवाल्यांचा खर्च अति आहे हिंदुस्थानांतील सिव्हिल सर्व्हिस मोठें खर्चाचें तोंड आहे. त्यांत बहूतेक साहेबलोक आहेत; बिन सनदीही साहेब लोक मोठ मोठ्या पगारावर आहेत; याजबद्दल किती पैसा जात आहे ह्याची कल्पना देखील नसेल. ह्या सर्व वरील गोष्टींचा खर्च हिंदुस्थानावरच आहे. कांहीं दिवसांमागें जान ब्रैट साहेबांनीं ह्या विषयीं माहिती काढिली तीं वरून कळतें कीं, इ०स० १८७९ ह्या वर्षीं एकंदर गोरे कामगार ११९१४ होते त्यांच्या नुसत्या पगाराचा साडेआठ कोटी रुपये, म्हणजे हिंदुस्थानांतल्या जमिनीच्या उत्पन्नाच्या अर्धा इतकें रुपये उडाले. इ० स० ८४–८५ ह्यावर्षीं अबकारी पासून जे तीन कोट रुपये उत्पन्न झाले तें मुलकी खात्यांतल्या साहेब लोकांच्या पगारास उडाले. व आफू पासून जे पावणें सहा कोटी दरसाल उत्पन्न होतात ते सगळे लष्करी साहेब लोकांच्या पगारास उडतात. आणखी हिंदुस्थानाच्या डोक्यावर कितीही ओझें वाढलें आणि हिंदुस्थानांतील प्रजाकरांच्या भाराखालीं कितीही चेंगरली तरी त्यांची दाद कोणींच घेतनाहीं व त्या बद्दलची जबाबदारी कोणावर नाहीं. ह्यांतून जेव्हां लोक पार पडतील तेव्हां खरें.

आमच्या सरकारानें आपला अनावर खर्च आस्ते आस्ते हर उपायानें आवरून यापुढें बेताबातानें आणि काटकसरीनें वागण्याचा दृढ निश्चय केला आहे याजवरून आडव्होकेट आफ इंडियानें अशी सूचना केली आहे कीं. सरकारानें लष्करी लोकांचे तेवढें पेनशन खातें ठेवून बाकी साऱ्यांना वाटाण्याच्या अक्षता लावाव्या ह्मणजे सऱ्हीना कोट्यावधी रुपयांचा ब... पैसेक... रंत सरकार बहुत करून देत आहेत ...ला खो आणणार नावी हें त्यासच ... सरकारच्या मनांत जे आकडे पडले ...ला तर निदान होणार, म... जी र... णार, नवांन नागा घरे

नेटिव्हांचा तरी सरकारानें बचाव करावा.

तंबाखू ओढण्यानें व दारू पिण्यानें अंधत्व प्राप्त होतें असें कित्येक डाक्टरांचे अनुभवास आलें आहे.

सरकारी कामांत पोष्टांच्या कार्डांचा उपयोग होईल तितका करण्याबद्दल मद्रास सरकारचा ठराव झाला आहे.

लंडन एथें एका ज्योतिष्याला भविष्यें सांगण्याचें ढोंग माजविल्याबद्दल शिक्षा दिली.

घा० वृ०

तरुणनिझाम व त्यांचे दिवाण वऱ्हाड प्रांताच्या संबंधानें माजी दिवाण सर सालरजंग यांच्या संबंधानें ज्या कित्येक गोष्टी बाहेर आल्या त्यांवरून या राज्याकडे लोकांचीं मनें जास्त लागलीं असून तशाच स्थितींत ते सालरजंग मयत झाल्यामुळें लोकांस जें वाइट वाटलें तें ही नवी जोडी एकोप्यानें व शहाणपणानें कारभार करूं लागल्यानें नाहींसें होऊन विशेष आनंद वाटूं लागला होता. हा आनंद कांहीं एक अडथळा वाचून आजपर्यंत चालला असतां तर मोठी गम्मत झाली असती, पण तसें न होतां थोड्याच दिवसांत त्या उभयतांत बेबनाव झाल्याचें बाहेर आलें. यासंबंधानें जी बातमी आली आहे ती बऱ्याच अंशीं आनंदाची असून ती खरी होवो अशी इच्छा आहे. असें सांगतात कीं, तरुणनिझाम व तरुण दिवाण यांच्यांत जो बेबनाव झाला होता तो नाहींसा होऊन एकोपा होण्याचा रंग दिसूं लागला आहे. पण हल्लीचा एकोपा तशा प्रकारचा दिसत नाहीं. दोघांच्या दरम्यान एक करार होऊन तो एकोपा होत आहे व त्या करारास तिऱ्हाइताची हमी घेण्यांत येत आहे असें दिसतें व त्या करतां हा प्रकार असावा तितका समाधान कारक आहे असे होत नाहीं. एक इंग्रजपत्र कर्ता सांगतो कीं, " दिवाणाच्या अधिकाराच्या संबंधानें निझामसाहेबांनीं कांहीं नियम तयार करून ते रेसिडेंटच्या स्वाधीन केले आहेत आणि त्यांत निझाम व दिवाण यांचीं कर्तव्येंही निर्दिष्ट केलीं आहेत. रेसिडेन्ट हे त्या नियमांच्या संबंधानें फार बारीक रीतीनें विचार व तपासणी करीत आहेत आणि ते नियम त्यांस पसंत झाले ह्मणजे त्या दोघांचें सख्य झाल्या सारखें होऊन त्यांच्यांतील बेबनावाच्या कारणानें राज्यव्यवस्थेस जो धोका आला होता तो दूर झाल्यासारखा होईल. " इंग्रज पत्राचीही बातमी अक्षरशः अशीच खरी असेल तर त्यापासून आनंद मानण्यास जागा नसून उलट दुःख मानण्यास मात्र कारण दिसते. असो, आज इतका प्रकार झाला आहे पुढें आणखीं काय काय होतो पाहावा.

वायव्य प्रांताकरितां एक कायदे कौन्सिल नेमायाचें आहे व त्याची रचना कोणत्या तऱ्हेची करावयाची असें हिंदुस्थान सरकारास हिंदुस्थानच्या सेक्रेटरीनें विचारिलें आहे.

निजाम सरकाराकडून फौजेच्या खर्चासाठीं इंग्रज सरकाराकडे दिलेल्या वऱ्हाड प्रांतांच्या उत्पन्नांतून खर्च वजा जातां जी शिल्लक राहते त्यापैशाच्या सरकारी लोन नोटी निजामसरकाच्या हद्दींत असलेल्या बंगाल ब्यांकेच्या शाखे मार्फत खरेदी करण्याचें काम चालू आहे.

ज्या जाग्यावर युरोपियन कामगार असतात त्याच जाग्यावर नेटिवलोक नेमिले असतां त्यांस काय पगार द्यावा याजबद्दलची वाटाघाट फायनेन्स् कमेटीमध्यें सुरूं आहे. हें खरें असेलतर नेटिव्हांचे नशीब उदयास येण्याचा रंग दिसतो असे म्हणावें लागते.

आमच्या इकडील मि. रामदास चुनिलदास हे बारिष्टरच्या परिक्षेत पास झाले. काबूलचा अमीर पुनः गुडघेमोडीनें आजारी झाला आहे.

काबूलास गव्हांचादर दर रुपायास ३ शेर प्रमाणें आहे. ठा० अ०

व्हियेना येथें भरणाऱ्या ओरिएंटल कान्ग्रेसास आमच्या सरकार तर्फे आमचे प्रसिद्ध संस्कृत प्रोफेसर डाक्टर रा० गो० भाण्डारकर जाणार आहेत, हें कळविण्यास आह्मांस फार संतोष वाटतो. या खेपेस या सभेस आमच्या येथील खरा संस्कृत पंडित जात असल्यामुळें मागें गेलेल्या आडनांवी पंडितांपेक्षां त्याची छाप विशेष पडेल, व पूर्वेकडील विद्वानांच्या संस्कृत विद्येचे खरें स्वरूप पाश्चिमात्यांच्या लक्षांत येऊन आमच्या विषयीं त्यांची पूज्यबुद्धि वाढेल, हें आह्मी सांगायाला पाहिजे असें नाहीं.

खानापुराजवळ—नदींत नांव उलटून पन्नास साठ मनुष्यें ठार बुडणार होती, इतक्यांत कांहीं वडरांनीं लोकांचा बचाव केला, पण त्यांच्या हात वर कोणी शिवराई ही ठेविला नाहीं!

रंगुनांत अशी बातमी उठली आहे कीं एक इंग्रजी बारिस्टर लौकरच विलायतेस जाऊन थीबा राजाची पुनः संस्थापना करण्याविषयीं त्याच्या तर्फे वकिली करणार आहे.

इंदुरचे महाराजांनीं व्याजनोती रद्द केल्यामुळें संस्थानच्या वसुलांत दोन लाख साठ हजार रुपयांची तूट येईल, व संस्थानांतून बाहेर जाणाऱ्या मालावरील जकात उठविल्यामुळें पन्नास हजारांची येईल असा अंदास केला आहे. के०

मुंबई येथील गव्हरनर साहेब लार्ड री हे भुलेश्वर पुस्तकालयाचे आश्रय दाते झाले.

एक अमेरिकन गृहस्थ कुत्र्यांच्या गाडींत बसून उत्तरेकडील ध्रुवा पर्यंत जाण्याचा प्रयत्न करणार आहे असें ह्मणतात.

विलायतेस आबर्डीन येथें बाराव्या शतकांत पुरून ठेवलेल्या एका भांड्यांत १९००० रुप्यांचें नाणें सांपडलें.

सिंधप्रांत शिवाय करून मुंबई इलाख्यांत उत्तम पर्जन्य झाल्याचे गेल्या आठवड्याच्या सरकारी रिपोर्टावरून समजतें.

एतद्देशिय नौकरांचा दोन तृतीयांश पगार कमी करावा असा लॉर्ड डफरिन यांचा बेत चालला आहे असें ह्मणतात. नसीब.

आस्ट्रेलियामध्यें जमिनीवरील पाणी यंत्राच्या योगानें वर नेऊन त्याची पर्जन्या प्रमाणें पुनः जमिनीवर वृष्टी करण्याची युक्ति काढिली आहे.

गव्हरनर जनरल साहेब हिंदुस्थानांतील लोकांस सिव्हिल सर्व्हिसच्या नोकऱ्या देण्याचा विचार करण्यास्तव एक कमिटी नेमणार आहेत. असें ह्मणतात.

ब्रह्म देशांत आणखीं तीन पायदळ पलटणी पाठविण्याचे ठरले असें ह्मणतात.

चालू सालच्या आरंभीं दोन महिन्यांत मिठाच्या कराचें १,१८,९७,००० रुपये उत्पन्न झालें.

चालू सालच्या दोन महिन्यांत ९१,२१,८८३ रु० चें सोनें व १,२९,२६,३२३ रु. चें रुपें हिंदुस्थानांत आलें व १८,६९,७०१ रु. सोनें व ६,६०,४९३ रुपें परदेशीं गेलें.

पुण्यास येत्या सप्टेंबरच्या २० तारखेस कलाकौशल्याचें, फळांचें व भाजीपाल्याचें प्रदर्शन होणार.

न्यूयार्क मधील एका स्त्रीनें आपल्या गाडीच्या घोड्यांच्या खुरास मुलामा दिला आहे असें ह्मणतात.

खानदेश जिल्ह्यांतील प्रख्यात दरवडेखोर खंडिया यांस तेथील अ. पो. सुपरिंटेंडंट मि. डेव्हिसन यांनीं पकडलें. तात्या बद्दल कांहीं चालत नाहीं. हे फारच लाजीरवाणें नव्हे काय?

याही प्रसंगीं मि० लालमोहोन घोस हे पार्लमेंटाचे सभासद निवडले गेले नाहींत.

मांडलें येथें शहरांत एक तुरुंग बांधण्याचा सरकार विचार करीत आहे.

इटलींत ब्रिंडिसी प्रांतामध्यें महामारीचा उपद्रव दिवसेंदिवस वढत चालला आहे.

स्पेन देशांतील कार्योजिना नांवाच्या स्त्रीनें जाराबरोबर पळून जाण्यास पैसे नव्हतें म्हणून आपले अज्ञान बालक २० फ्रांकांस गहाण ठेविलें होतें! ! काय हा लंपटपणा?

रशिया व फ्रान्स यांचे ऐक्य झालें अशी वदंता आहे.

नेपाळांत चांगली पर्जन्य वृष्टि होऊन पीकपाणी उत्तम स्थितींत असल्याचें समजतें.

दिल्ली व आग्रा येथें दोन कापसाच्या नवीन गिरण्या स्थापन होणार आहेत.

कलकत्ता येथील मेडिकल कालेजांत स्त्रियांस घेण्याची मोकळीक झाल्यापासून १७ विद्यार्थिणी त्या कालेजांत जाऊं लागल्या.

जपानांत ४२,४६७ वैद्य शास्त्रांत प्रविण असें परीक्षा दिलेले वैद्य आहेत.

न्यूयार्कमध्यें कर्जाकरितां सहा महिन्यापेक्षां अधिक दिवस तुरुंगांत ठेवूं नये असा कायदा झाल्यामुळें कित्येक वर्षांपासून कर्जास्तव तुरुंगांत असलेले पुष्कळ लोक सुटलें. सु० प०

☞ हें पत्र आकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० के०

सालअखेर " ७ " " १८
फिरकोळ अंकास.................. ॰४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ॰१॰६
दुसरे खेपेस .........॰१

Per annum in arrears 7 " 1R. 8 as
Six monthly............ 3 " 8 as
Single copy............................ 4 as

Advertisements.
Below 10 lines...2Rs
Per line over 10...4as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERARSAMACHAR.

VOLXX AKOLA MONDAY 26 JULY 1886 NO 29

पुस्तक२० अकोला सोमवार तारीख २६ माहे जुलई सन १८८६ इ० अंक २९

## पत्रव्यवहार,

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

परदुःखेन दुःखिता विरला

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस–

वि० वि० महाराज आपण तर मोठींच माणसें दिसतां. पर्जन्याचे अतिवृष्टीनें पीडित झालेल्या लोकांकडे आपले लक्ष पोंचत नाहीं वाटतें. हायहाय! बिचारे पुरानें घरादारा पासून मुक्त झाले. पाऊस तर एक सारखा चालूच आहे व निवाऱ्याची जागा त्यांस मुळींच नाहीं अशा स्थितींत त्यांस राहूं देणें हें अकोल्याचें बड्याबड्या धेंडास किती भूषणास्पद व श्रेयस्कर आहे बरें?

मी ऐकतों कीं या लोकांचें दुःखाचें निरसन करण्याकरितां एक टोलिंग कमिटी नेमली आहे. ती वर्गणी जमा करीत आहे व अनाथ झालेल्या लोकांस खावयास देत आहे. पत्रकर्ते राव कांहीं सभ्य गृहस्थांनीं शोध केल्याअंतीं असें समजलें आहे कीं अन्नाची मदत फार थोड्या लोकांस पाहिजे. किंबहुना असें लोक नाहींत असें सुद्धां ठोकळ मानानी ह्मणण्यास हरकत नाहीं, असें असून आमचे नेटीव साहेब लोक त्याच कामीं कां बरें गुंग झाले आहेत. वास्तविक लोकांस निवाऱ्याचें जागेची फार अडचण आहे. ही गरज पुरी करण्याकडे अद्यापिही आमचे साहेब लोक वळले नाहींत ही मोठी दुखाःची गोष्ट आहे.

"आई जेउ देईना व बाप भीक मागू देईना" अशी स्थिति या पीडलेल्या लोकांची झाली आहे. आहेत तीं घरें दुरुस्त करूं देत नाहींत. व दुसरी जागाही दाखवित नाहींत. त्यांस अश्वासन मात्र कोरडें मिळतें कीं थांबा. थोडे दिवसांत तजवीज करूं. यांचें थोडें दिवस संपण्यापूर्वीच गरीब बिचाऱ्यांचें राहिलेलें आयुष्याचें थोडें दिवस संपतील असा सुमार दिसतो.

हिरण्यद्वारा जी मदत होण्याची तो प्रकार बराच दूर दिसतो. एडिटरराव अशा कामास निदान दोन तीन हजार रु० पाहिजेत व कमिटी तर अद्याप चार पांचशांतच गटकळ्या खात आहे. तेव्हां हें जमावें कसें. फार दुःखाची गोष्ट आहे कीं अकोल्या सारख्या ठिकाणीं अशा सत्कृत्यास पैशाची व्हावी तशी मदत होत नाहीं. मोठ्या नावालौकिकाचे शिकलेलें व पैसेकरी असें लोक सुद्धां भिकार रकमा देत आहेत तेव्हां मजल कशी मारली नावी हें त्यासच समजत असेल. बरें असतु. जे आकडे पडले आहेत ते वसूल केव्हां होणार, व जी रकम देणार ती केव्हां देणार, नवीन जागा घरें बांधण्यास देणार ती केव्हां. व तीं घरें बांधण्या करितां पैशाची मदत करणार केव्हां हें तुह्मांस समजलें असले अगर समजण्याचें साधन असल्यास कळवाल तर गरीब बिचारे लोक तोंपर्यंत कंठीप्राण धरून कसेंतरी राहतील. हेंपहा, अशी ढिलाई होणें ही दुसरेंपक्षी साहाजिक आहे. कारण आमचे वर लिहिलेल्यास ह्या पसून काय त्रास आहे बरें. उत्तम घरांतून राहाण्यास जागा आहे. दरवाज्या बाहेर निघालें कीं गाडी आहे. थंडीचें निवारणार्थ लॉंगकोट आहे बूट आहे सर्व कांहीं आहे. मग त्यांनीं तरी कां जलदी करावी बरें.

एडिटर राव "बाबा मरेंगे बैल बाटेंगे:" असेंच होतें कीं काय कोणजाणें. पहा तुह्मी तरी ओरडा कांहीं फायदा झाला तर होईल. पत्रविस्तार फार झाला सबब पुरें करितों. लोभ करावा ही विनंती.

ता. २२-७-८६ ग्रामस्थ-

वऱ्हाडसमाचार

मित्ती आषाढ वद्य १० शके १८०८

## हल्लीच्या प्रासीवर बसलेला कर.

( मा. अं. पुढे चालूं. )

वर लिहिलेली सूचना टाईम्स आफ इंडियाचें एडिटरांनीं केली आहे तिचे बरोबरीनें दुसरी एक सूचना त्यांनीं केली आहे ती ही कीं नेटिव्ह लोकांस मोठमोठ्या पगाराच्या जागा द्याव्यात. व असें केल्यानें सरकारांस खर्च कमी लागेल व पैसे कमी लागतील. साहेब लोक आपला देश सोडून हजारों कोस येतात त्यामुळें त्यांस फार खर्च लागतो व साहाजिकच त्यांस जास्त पगार अवश्य आहे; परंतु नेटिव्ह लोकांची गोष्ट तशी नाहीं. त्यांस आपलें देशांत राहून काम करावयाचें त्यामुळें त्यांस पुष्कळ कमी पगार दिला तरी चालेल. या संबंधानें एक साहेबांचें असें मत आहे कीं ज्याठिकाणीं साहेब लोकांस १,००० रुपये पगार असतो त्याठिकाणीं नेटिव्ह लोकांस ७०० रुपये दिला तरी हरकत नाहीं. पत्रकर्त्यांच्या ह्मणण्यांत बराच खरेपणा आहे हें कबूल करावें लागेल. आजपर्यंत बड्या बड्या पगारांच्या जागा पाहिल्या तर साहेब लोकांस; व पुष्कळ श्रमाच्या व थोड्या उत्पन्नाच्या जागा नेटिव्ह लोकांस अशी व्यवस्था चोहोंकडे नजरेस पडतें. हल्लीं पुष्कळ लोक विद्वान असून मोठमोठ्या हुद्याच्या व जबाबदारीच्या जागेवर नेमण्याजोगें असून त्यांस केवळ नेटिव्ह असल्यानें नेमण्यांत येत नाहीं नेटिव्ह लोक काम करण्यास नालायक आहेत अशी ओरड जी होती ती बहूतेक अनुभवाअंतीं खोटी आहे असें समजत चाललें आहे आतां या देशातील मुख्य मोठ्या पगाराच्या जागा म्हटल्या ह्मणजे सिविलसर्वीसच्या, ह्मणजे ज्यांचे नोकरीचा करार स्टेट आफ सेक्रेटरीशी इंग्लंडदेशांत होतो ते मुख्यत्वेंकरून यांत सुधारणा पाहिजे आहे म्हणजे ज्या प्रमाणें हल्लीं सिविल सार्विसची परीक्षा विलायतेंत होते. व त्यामुळें या देशातील उमेदवारास तिकडे जाऊन परिक्षा पास होणें कठीण पडते तें अगोदर बंद झाले पाहिजे सिव्हिलसर्व्हिसचे घबाड केवढें विलायती भटास सांपडलें आहे! आज शेंकडों साहेब लोक ज्यांस विलायतेंत आज बटाटे खाऊन निर्वाह करावा लागत असतां अशा प्रकारचे लोक या देशांत येऊन केवळ राजाप्रमाणें असिस्टंट कलेक्टर व कलेक्टरच्या जागा मारतात व पगार २५००रुपये महिना. यामुळें आज लक्षावधि रुपये विलायतेंत जात आहेत. हें पैशाचें एक जबरदस्त द्वार बंद झाल्यास लक्षावधि रुपये देशांतल्या देशांत राहणार आहेत. हा प्रवाह बंद होण्या बद्दल खटपट करणें म्हणजे बहुतेक रोगाचें मुळाशीं हात घालणें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आतां हा जरी वास्तविक उपाय आहे व यामुळें सरकारची बरीच किफायत आहे तरी सरकार म्हणजे तिकडे विशेष लक्ष देईल असें नाहीं. नुकतेच पार्लमेंट सभेंत स्टेट सेक्रेटरींनीं असें सांगितलें कीं थोडक्या दिवसांत सिव्हिल सर्व्हिसच्या संबंधानें हिंदुस्थानांत गव्हरनर साहेब एक मंडळी नेमतील एवढ्या बोलण्यावर आज स्वस्थ बसणें भाग आहे. टाईम्स ऑफ इंडियाची सूचना चांगलीशी दिसते खरी पण त्याचा अशी सूचना करण्यांत खरोखर काय उद्देश आहे हें बरोबर आज मित्तीस कळत नाहीं.

## इंग्लंडांत पांचवर्षें काढलेल्या एका हिंदू गृहस्थानें "ट्राव्हनकोर स्पेक्टेटरांत" इंग्लिश राष्ट्राचें खालीं लिहिल्या प्रमाणें वर्णन केलें आहे:---

" राष्ट्र या नात्यानें पाहिलें असतां इंग्लिश लोकांच्या आंगीं मोठमोठ्या मानसीक शक्ति आहेत असें म्हणतां येणार नाहीं. बुद्धि वैभवाच्या मानानें इंग्लिशलोक यांचेच भाउबंद जर्मन्स व फ्रेंच यांच्यापेक्षां फारच खालीं आहेत. आतां त्यांच्यांत न्यूटन, बेकन् आणि शेक्सपीयर यांच्या सारखे विशाल बुद्धीचे पुरुष होउन गेले आहेत खरें तथापि हीं अपवादात्मक उदाहारणें आहेत. सरासरीनें पाहिलें असतां इंग्लिश लोकांच्या आंगीं साधारण इतर युरोपियन लोकां पेक्षां बुद्धी विशेष असत नाहीं. परंतु बुद्धी नसल्या मुळें इंग्लिश लोकांच्या आंगीं जें व्यंग दिसून आलें असतें तें साधारण अकलेच्या योगानें भरून आलें आहे. या लोकां सारखी साधारण अक्कल दुसऱ्या कोणत्या राष्ट्रास नाहीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं. वास्तविक बुद्धी त्यांनां फारच थोडी असते परंतु तारतम्य व अक्कल यांची त्यांना चांगली देणगी आहे. मी इंग्लंडांत असतां तेथील होतकरू गृहस्थांच्या बुद्धिवैभवा विषयीं आपलें मत बनविण्याचे प्रसंग मला पुष्कळ आले होते उदाहरणार्थ कैंब्रिजच्या युनीव्हरसिटितील विद्यार्थी ह्या. इंग्लंडांतील प्रख्यात असे विद्वान लोक याच विद्यालयांत तयार होतात परंतु या विद्यालयांत प्रतिवर्षीं जे लोक तयार होतात त्यांच्या एकंदर संख्ये कडे जर पाहिलें तर ऑनर्स मिळवून पास होणाऱ्यांची संख्या शेंकडा ५० देखील निघत नाहीं. सारांश एखाद्या कठीण व गहन विषयाचें अध्ययन करण्याकडें ह्या लोकांची सहज प्रवृत्तिच नाहीं. आपण त्या लोकांपैकीं एखाद्याशीं थोडावेळ भाषण करण्यास जर लागलों तर तेवढ्या वेळांत देखील त्यांच्या बुद्धीची खरी कींमत दिसून येते. तत्वज्ञाना सारख्या गहन विषयावर वादाविवाद करण्याची यानां मुळींच हौस नाहीं. एकापेक्षां अधिक गोष्टी वरून कांहीं अनुमान काढणें कींवा साधारण सिद्धांत ठरविणें यागोष्टी त्यांना फार कठीण वाटतात. + + + + + मी वर लिहिलें आहे कीं त्यानां स्वतःनां फारसें बुद्धिवैभव नाहीं. परंतु इतकेंच नाहीं. ज्यालोकांना विशाल बुद्धि वैभवाची देणगी आहे अशालोकांचा ते तिरस्कार करतात. उदाहरणार्थ जर्मन लोकां विषयीं त्यांचें साधारण मत घ्या. मीं स्वतः ऐके दिवशीं एका इंग्रज गृहस्याला जर्मन लोकांच्या अभ्यासी सवयीं विषयीं त्याचें मत विचारिलें तेव्हां रुपये ने ५०० रु. भर केलें कीं " अं: ते नेह बसणारे दुर्दैवी प्राणी आ

दां एका उत्तम गणित मानसार

विचारिले कीं गणि फिनान्स कमेटीच्या कारणानें स्ती कोणाची. हायकोर्टांतही कांहीं काटकसर जर्मन यांची असें दिसतें.

उतरकेलें '

काम कं

निर्माण केलेल्या गोष्टी मध्यें मात्र आमची निपूणता. दुसऱ्यांची पिसें टसनी घेऊन आली आपला देह विभूषीत करीत असतो. " खरीगोष्ट आहे.

## ऐरिश प्रकरण

आतां मात्र ऐरिश प्रकरणाचा कांहीं तरी भयंकर परिणाम होईल असें वाटतें. प्रथमतः जेव्हां ऐर्लंडांत दंगे, मारामाऱ्या, सरकारी नोकरांचे खून हे चालू होते त्यावेळेपेक्षांही भयंकर परिणाम होण्याचा संभव हल्लीं येत चालला आहे. जोंपर्यंत इंग्लंडची पार्लमेंट सभा आपणांस न्याय देईल असें ऐर्लंडांतील लोकांस मानण्यास जागा होती तोंपर्यंत सर्व दंगे धोपे बंद होते व विलायतेतून त्या संबंधानें बातम्या येणेंही बंद झालें होतें. इंग्लंडदेशांत प्रजासत्ताक व राजसत्ताक असे दोन प्रबल पक्ष आहेत. प्रजासत्ताक लोकांचा नेहमींचा कल असा कीं जेणेंकरून प्रजेचे हक्क वाढतील अशा गोष्टी करण्याचा यत्न करावयाचा व राजसत्ताक लोकांचा नेहमींचा कल ह्मटला ह्मणजे जेणेंकरून राजकीय पक्षास अनुकूलता येईल अशा गोष्टी करावयाच्या. हल्लीं चालू असलेल्या ऐरिश प्रकरणाचें संबंधानेंही हा नियम लागूं होतांच ग्लाडस्टन ह्मणजे लोकसत्ताक पक्षाचे प्रमुख यांचें व त्यांचें अनुयायी यांचें ह्मणणें कीं ऐर्लंडदेशाचे हल्लींचे स्थितीवरून त्यादेशांतील लोकांस स्वतंत्रता देणें इष्ट आहे. ह्मणजे एकंदर इंग्लंड, स्काटलंड व ऐर्लंड ह्या तिन्ही राज्यांची एकी नाहींशी न करितां ऐर्लंड देशांतील लोकांस त्यांचे देशापुरती कायदे करणारी सभा निराळी नेमण्याचा हक्क त्यांस दिला पाहिजे. लॉर्ड सालिसबरी म्हणजे राज्यसत्ताक पक्षाचे प्रमुख यांचें म्हणणें कीं एर्लंड देशाला कायदे करणारी मंडळी निराळी झालीतर एकंदर राज्याची एकी नाहींशी झाल्या सारखीच आहे. व असें करणें बिलकुल प्रशस्त नाहीं. याप्रमाणें इंग्लंडांतील मुख्य जे दोन पक्ष आहेत त्यांचीं मतें आहेत. एर्लंडास निराळी पार्लमेंट असावी अशा विषयीचा आग्रह मूळ पार्नेल साहेब म्हणून ऐरिश सभासद आहेत त्यांचा. प्रथमतः लोक त्यांचें म्हणण्यास हांसत असत. परंतु होतां होतां त्या बाहादुरानें आपली वाणी शेवटास नेण्याचा प्रसंग आणिला. व एकंदर दोन्ही पक्षांचे लोकांची शेंडी जणूं काय पार्नेल साहेब व त्यांचे अनुयायी यांचे हातीं आली. शेंकडों वर्षे एर्लंडाचे संबंधानें इंग्लंड देशानें अन्याय केला, व न्याय करण्यास्तव ऐर्लंड देशास स्वतंत्र पार्लमेंट सभा असावी असा पार्नेल साहेबांनीं आग्रह धरिला. गेल्या पार्लमेंट सभेंत ग्लाडस्टन साहेबांनीं [illegible] ळी पार्लमेंट असावी अशा [illegible] ायदा सभेपुढें आणिला. [illegible] नें ग्लाडस्टन साहेबांचे [illegible] शाही; म्हणजे त्यांचे [illegible] लोकांचें मत [illegible] लें; तेणेंकरून ते [illegible] क त्रितीय पंथ [illegible] चे संबंधानें

out[illegible] the Cau[illegible] chid in his [illegible] with Mr. Alb[illegible]

पार्लमेंट सभेंत चार पक्ष झाले. ग्लाडस्टन साहेबाचा एक, च्यांबरलेन साहेबांचा दुसरा, पार्नेल साहेबांचा तिसरा व कान्सरव्हेटीव म्हणजे राजसत्ताक पक्ष चवथा. असे चार पक्ष झाल्यानें ग्लाडस्टन साहेबांनीं आणलेल्या कायद्याचा सहज मोड झाला. त्यामुळें ग्लाडस्टन साहेबांस असें वाटलें कीं कदाचित् हल्लींच्या पार्लमेंट सभेंत लोकांनीं निवडून पाठविलेले मुखत्यार एकंदर राष्ट्रांतील लोकांचें खरें प्रदर्शक नसून कांहीं तरी अयोग्य मत देत आहेत; असें वाटून त्यांनीं ती पार्लमेंट सभा मोडून दुसरी सभा भरविली. परंतु पूर्वीं पेक्षांही अधिक लोक हल्लींच्या सभेंत कायदा नको ह्मणणारे निवडले गेले आहेत. यावरून इंग्लंड देशांत जनसमूहाचेंमत ऐर्लंडदेशास निराळी पार्लमेंट सभा देऊंनये असें आहे. हें उघड झालें. इतक्या थरास गोष्ट आल्या नंतर ग्लाडस्टन साहेबांचे पक्षानें प्रधानकीचा राजीनामा देण्याचा नियम केला आहे. हीगोष्ट चमत्कारिक नाहीं.

पुढे चालू.

√ गेल्या आठवड्यांत उमरावती ऐथील क्यांप मध्यें एक मोठी आश्चर्य कारक गोष्ट घडून आली. तेथील व्हालंटीयर कोरचे सार्जंट मि. मिलेट यांच्या लहान मुलास तेथील सिव्हिल आस्पिटल मधील आसिस्टंट मि. रघुपतराय हे कांहीं दिवस औषध देत होते. व पुढें सिव्हील सर्जन डा० रो साहेब हेही त्याला पाहतहोते. असें असतां तो मुलगा एका एकीं मरण पावला त्यामुळें साहेबांचे माथे फिरून त्यांनीं घरांतून किल्ली घेऊन व्हालंटियर कोरच्या आरमरींत जाऊन एक बंदूक भरून घेतली. व डा० रघुपतराय यांनेंच आपले मुलास मारलें अशी वेडगळ समजूत धरून त्यांना गोळी घालण्याच्या इराद्यानें इकडे तिकडे शोध करीत फिरूं लागलें. सुदैवानें मि. मिलेट यांचे बायकोनें आपल्या नवऱ्याच्या डोक्यांत हें वेड भरलेलें पाहून गुप्तपणें रघुपतराय यांना संभाळून राहण्याची सूचना पाठविली. त्यामुळें ते एका सुरक्षीत जागीं राहिले होते. इकडे मि. मिलेट साहेबांनीं आस्पितळ, बाजार वगैरे सर्व ठिकाणें शोधिली परंतु रघुपतराय कोठेंही सापडले नाहींत तेव्हां तोंडानेंच बडबड करीत व धमक्यादेत राहिले. आखेरीस ही बातमी त्यांचेच मित्र मि. पीटर व मे. बुलक साहेब वगैरेंस कळतांच त्यांनीं त्याचो " बा चिमण्या " इत्यादी प्रकारें विनवण्या करून समजूत घातली. व त्यामुळें सर्व विघ्न टळलें. असो. मि. रघुपतराय हे फारच लोकप्रिय आहेत व त्यांजवर ही मोठीच गदा आली होती असें ह्मणण्यास हरकत नाहीं. अशा मोठ्या प्रसंगांतून ते सुरक्षीत पारपडले हें ऐकून त्यांचे सर्व मित्रांस आनंद होईल यांत संशय नाहीं.

√ हल्लीं आणखीं असें समजतें कीं मि. रघुपतराय यांनीं आपला प्राण घेण्या विषयीं प्रयत्न करण्या बद्दल मि. मिलेट यांजवर मे. डे. क. बुलक साहेब यांजकडे फिर्याद केली आहे. परंतु या फिर्यादींत खुद्द डे. क. साहेबांची साक्ष असल्यामुळें त्यांनीं हें प्रकर्ण मे. ज्यु० क० साहेबाकडे पाठविलें आहे. आतां याची चौकशी कोणा समोर होणार तें कळत नाहीं. वऱ्हाडांत अशा प्रकारचा हा पहिलाच खटला आहे तेव्हां त्याच्या निकाला कडे सर्वांचे डोळे लागतीलच. फिर्यादी तर्फे मि० मुधोळकर हे वकील आहेत तेव्हां हें प्रकर्ण लोकांच्या नजरे पुढें जसें यावें तसें येईलच. मात्र न्यायाधीश साहेब कोण मिळतात तें पहाणें आहे. आम्ही आशा करितों कीं फिर्यादीस योग्य न्याय मिळून आरोपीस योग्य शासन होईल व तेणेंकरून अशा प्रकारची दांडगाई करणाऱ्यांसही चांगलें उदाहरण होईल.

# The Berar Samachur

MONDAY JULY 26 1886

## A PLEA FOR NIGHT SCHOOLS IN BERAR.

We have said in our last issue that the fees in the Berar schools should not be raised under the pretence of giving more scope for the Indigenous schools to grow up. We have stated already that it is not because people find the fees lighter in Government schools that they resort to it, but because the people who send their children to Government schools think Government schools better than Indigenous schools. Indigenous schools cannot be forced up by any contrivance which would favor their growth, but they must, if at all, rise spontaneously. It is only when people get a taste for education and the feeling is widespread, that private schools can be so much as thought of. The routine of the Government curriculum must sufficiently dissatisfy the general public before the educational instincts advance into a new groove; for the rise of private educational institutions has been always the result of a desire for a particular kind of education to be impressed on the younger generation.

We have once alluded to in our Marathi columns to the want of Night schools in Berar; but of course the proposal has not met with a word of approval or disapproval from any of our Berar contemporaries. We believe that if it is really the desire of Government to spread Primary Education amongst the ignorant masses of Berar the Night School system is the proper thing. We advocate the Night School system on this ground that the schools will be taken advantage of by the elderly rustics of a village, whose eyes daily open to the perception of the fact that reading and writing is a necessity to them but who cannot avail themselves of the benefits of a Government School where education can be had during the daytime only. We are given to understand that if the Night Schools are opened in villages and the instruction given in them is made to consist of the things that villagers need in their practical every-day life, the Night School system will be a success. The most vulgar villager is daily becoming aware of the fact that the cunning of the wily Marwary mony lender of his village has overreached his *narvele* and will eventually ruin him, if he goes on making a mark on instruments as his forefathers have done before him and cannot make a signature in his own handwriting which he can recognize at any time. And yet the villager hardly can spare time during the working hours of the day. If therefore simple reading and writing and simple rules of arithmetic are taught by night there is every reason to believe there will be a satisfactory gathering of elderly boors of the village ready to benefit by the new facilities afforded to them. It is even now well-known that the dislike of the villagers to send their children to Government schools is on account of the jargon of history and geography and the unmeaning host of grammatical rules and technicalities. In the eyes of a villager history and geography and grammar are useless for he looks to the sphere in which his son has to pass his life, and as there is very little practical need for these subjects during the whole life of his children his view of the matter is not utterly untenable. The dislike thus apparent, accounts in part for the successful existence of Indigenous schools during the first days of the Berar Educational Department. This dislike has been removed of late to a great extent because there are some substantial benefits that the children derive by going to Government schools, not the least important of which is the employment of the boys as teachers after passing a test in the normal school of the Province. But after all, Government schools are not yet availed of; and this is in a great measure owing to the inaptitude of the education given in Government Schools, to meet the want of the people in the villages.

If only the very first necessary things be taught in the Night Schools, the system, we believe, ought to succeed. A model framed on the principles laid down by Herbert Spencer would be fit for our present Government Schools; but even if we take slight hints from the suggestions there made the Night School system might be made interesting and useful. If for instance instruction be given to the peasants regarding the simplest laws of sanitation and health in their villages an amount of misery will be alleviated and much practical happiness will ensue. Of course the masters in these schools will have to be of energetic nature--persons who have more than mere mercenary motives at heart, who have in fact real interest in the work they are to undertake. The experiment at any rate is well worth trying in Berar. It is to be hoped the Educational authorities give their serious consideration to the subject and if the subject is at least an item for discussion in the Educational Conference to be held at Akola in coming November we shall feel satisfied.

For our own part we should think that such experiments may be tried by a Berar Night School Society. Nobody can deny that subscribing for an object like this is one of the noblest use of money that people having money can make. In this matter we would expect the graduates in our province to take the lead. There are not an inconsiderable number of them to start an experiment of a Night Schoool, if they can but manage to ward off their

# PROVINCIAL TABLE I.

---

*Area and Population of Districts, Subdivisions and Revenue Thanas.*

curious apathy to such things, at Amraoti our centre of light in Berar. We should however, first like to see the subject well dis cussed and threshed out by people who interest themselves in the matter; and we earnestly hope the subject is taken up by our Berar papers and especially the ensuing Educational Conferance.

## THE REJECTION OF THE HOME RULE BILL.

We beg to present to our readers a description of the scene in the House of Commons on the rejection of the Home Rule Bill. The extract being too long we are sorry we could not take the whole; but we have taken the most important and as well as the most interesting portion.

'The Prime Minister was in excellent voice, though he drank more frequently from the pomatum-pot than usual, but even he had nothing new to say about his Bill. There were eloquent passages, of course, in a speech from the most accomplished orater of the day, and his bit about Chamberlain was in the best vein of Parliamentary satire. "My right honorable friend has trimmed his vessel and touched his rudder in so masterly a way, that from whatever quarter of the heavens the wind may blow it must fill his sails." The Old Man spoke for an hour and forty minutes, and sat down at ten minutes past one, when the Speaker rose and said, 'The original motion before the House is that this Bill be now read a second time: since which an amendment has been moved to leave out the word"now" in order to add at the end of the question the words "upon this day six months." The question that I have to put is, that the word "now" stand part of the question. Those who are of that opinion will say Aye"- a thunderous sound from the Home Rule and Radical benches; 'The contrary, No-' a deep-toned chorus, from the Conservative benches. 'I think, the Ayes have it.' ('The Noes have it, from a score of mouths.) 'Strangers will withdraw.' The two-minute sandglass is turned down, the doors are thrown wide open, the electric bells clang in every room and corridor throughout the vast building, the attendants bawl 'Division' down the passages to one another; the tramp of hurrying feet from Library and Smoking room is at length silent, the last sand has run out, the doors are closed and locked, and once more the Speaker goes through the cumbersome and confusing form of putting the question. 'The Ayes to the Right, Noes to the Left. Tellers for the Ayes: Mr. Morley and Mr. Marjoribanks. Tellers for the Noes: Mr. Brand and Mr. Caine.' And then in ten minutes, by two streams of chatting and chaffing men sauntering through two long lobbies, and giving their names as they pass to two clerks who sit at wooden wickets and tick them off a printed list, the fate of millions of people is decided, and an issue settled that in other days would have brought a Turenne into the field against a Marlborough. In the 'No' lobby, along with the whole Conservative party were to be seen old John Bright sitting besides Sir John Mowbray, and shaking hands with the many members who came to pay their respects to the old tribune, and Lord Hartington, looking every inch a marquis, with his hands in his pockets and his underlip-out, and the desposed First Consul of the Caucus, with the never-failing orchid in his dresscoat, who, together with Mr. Albert Grey on behalf of Lord Hartington, stood at the wicket, with lists of their own in their hands to see who were true to their pledge and who funked at the last minute, and Mr. Goschen peering anxiously around, and Mr. Trevelyan and Mr. Courtney (appointed Chairman of Committees by Mr. Gladstone), and Mr. Caine, and a host of lesser Liberal lights. Slowly the men made their way through the crowded lobbies and to their places in the packed House. As each man entered the House he was eagerly asked his number by his friends. At length Colonel Walrond rushed in from behind the Spesker's chair and sat down on Lord Randolph's knee. 'It's all right: the Bill's lost: we've passed them.' How many? 'You will have a majority of twenty, said some one to Chamberlain, as he stood by the wicket. 'I want more than that,' said the imperturable Joseph, and he got it, for when the numbers were handed to the tellers, it was found that the Ayes to the right were 311, and the Noes to the left were 341. Anything to equal the wicked fury and demoniacal hatred of the Irishmen it is impossible to imagine. Oaths and foul names were heard in the Chamber, and it was only the exercise of some temper and prudence by the Conservatives that avoided more than one fracas in the lobby. Mr. W. O'Brien looked really dangerous as he stood up waving his hat and yelling defiance at the Saxon, and it is rumoured that he called a member of the late Goverament 'a confounded jackass.' Hartington, who strolled out into the Central Hall to telegraph the news, was loudly cheered, though a few Home Rulers hooted. There was a large crowd outside Palace Yard, and a great number of police. Suddenly there was a rush and a roar, and the Member of Parliament, stopping to light his cigar, saw an open victoria being driven rapidly towards Downing Street, escorted by two mounted and several running policemen, and containing on Old Man muffled in a grey plaid which still allowed the familiar shirtcollar to appear in the morning dawn and whose yellow face looked weirdly and werirdly upon the hooting and cheering mob. *Sic transit gloria Gladstonii.*'

The Indu Prakash has the following on the recent action of the Hyderabad Council in reversing a decision of the Local High Court. Nawab Salar Jung is certainly to be congratulated on the independence of spirit he has shown in expressing a dissent as a ruler of Berars. We have greatest interest in the well being of the parent state and cannot but deprecate such unworthy attempts on the part of the executive to shake the credit of justice and make it a farce pure and simple.

"It is therefore with great regret that we hear that the Council of the Nizam of Hyderabad has upset the decision of His Highness's High Court. The Council was established for purely administrative purposes and when it usurps the powers of a court of justice and sits in judgment over the highest judicial tribunal of the State it becomes guilty of a misuse or rather abuse of authority. It is creditable to Nawab Salar Jung that he protested against this illegal exercise by the Council of a right not vestsd in it by the law of the State. But we are afraid laws prove futile unless they are backed up by a strong public opinion and this is wanting in Hyderabad as in most of the Native States."

We beg to acknowledge with thanks the receipt of the following.

Report on the Criminal and Civil justice. H. A. D. for 1885.

Report on the Jails of the H. A. D. for 1885.

## वऱ्हाड.

आह्मांस असें कळतें कीं उमरावती हायस्कुलांतील फर्स्ट अ० मास्तर रा. रा. विसाजी रघुनाथ जोशी यांनीं दोन वर्षांची रजा मिळण्या विषयीं मे. डायरेक्टर साहेबाकडे अर्ज केला आहे.

उमरावती येथिल पहिल्या नंबरच्या मुलींच्या शाळेवर पुणें येथलि फीमेलट्रेनींग कॉलेजांत पसार झालेल्या एक बाई हेडमास्तरीण नवीन आल्या आहेत. बाईला पगार दरमाहा ३० रुपये ठरला आहे. उमरावतीस मास्तरीणबाई ह्या पहिल्याच आहेत. परमेश्वर यांना चांगली सद्बुध्दि देऊन वऱ्हाडांतील स्त्री शिक्षणाला उत्तेजन येईल अशा रीतीनें वर्तणूक यांजकडून करवो असें आह्मी इच्छितों.

आह्मांस असें समजतें कीं उमरावती येथिल डे. क. कचेरींत डे. क्लार्कचें काम करीत असलेले रा. रा. रघुपतराव हे मे. डे. क. साहेबांचे पसंतीस न उतरल्यामुळें या जागेवर तेथिल हायस्कुलांतील थर्ड अ. मास्तर रा. रा. वासुदेव विठ्ठल चांदेकर यांना नेमण्याविषयीं उत्तम शिफारस झाली आहे. व बहुत करून त्यांनाच ती मिळेल असें वाटतें. रा. रा. चांदेकर हे हुशार आहेत व इंग्रजीचें ज्ञानही त्यांना चांगलें आहे तेव्हां ते मे. बुलक साहेबांना पसंत होतील यांत संशय नाहीं. रा. रा. रघुपतराव यांना मात्र मुर्तिजापुरास परत यावें लागणार ह्मणून आह्मांस वाईट वाटतें.

आखेरीस उमरावतीचे वाचनालया करितां त्याचेच शिलकेंतून व कांहीं मु. क. ची मदत घेऊन एक टोलेजंग इमारत टावरचे कंपाउंडांत बांधण्याचें ठरलें. हें सर्व काम रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण बापट यांचे देखरेखीं खालीं व्हावें असेंही ठरलें आहे.

रा. रा. रामचंद्र दाजी नगरकर बिए. एल.एल. बी यांना पुण्यास अ. सबार्डीनेट जज्य नेमल्यामुळें ते आपले कामावर रुजू होण्याकरितां गेले आठवड्यांत तिकडे निघून गेले.

ता. १९ जुलईचे रेसिडेन्सी आर्डर वरून:–मि० फिट्स पॅट्रिक ए. आ. क. फोर्थक्लास यांना ए. आ. क. थर्डक्लास नेमलें परंतु ते आजमीरकडे काम करीत असल्यामुळें मि. आयोध्याप्रसाद ए. आ. क. फोर्थक्लास यांना थर्डक्लास केलें.

मे. कर्नल लाटन साहेब डे. क. वाशीम यांनीं ता० १० मे पासून पेन्शन घेतलें.

मि. वामनराव नारायण बापट ए. आ. क. जिल्हा बुलठाणें यांना पहिला वर्ग माजिस्ट्रेटचा व ५,००० रुपये पावेतों दिवाणी काम चालविण्याचा असे अधिकार मिळाले.

मि० यशवंत महादेव वणी येथील आ. तहशीलदार याना १०० रु. पर्यंत दिवणी काम चालविण्याचा अधिकार दिला.

डा० जी. नंदी एम. ए. एल. एल. डी' आनररी आ. क. यांना ते घेतील त्यादिवसापासून ६ आठवड्याची सिक रजा मिळाली.

पिंपळगांव राजा येथील गुमास्ते पाटील रा.रा. देवराव रामराव यांना कमलनाथ घासीराम हे वारल्यामुळे त्यांचे जागीं तेथील डिस्पेन्सरी कमेटीचे मेंबर नेमिलें.

मि. बेकर यांनीं राजीनामा, दिल्यामुळें त्यांचे जागीं मि. स्टान्पाक मुंबई बांकचे एजंट यांना उमरावती मु. क. चे मेंबर नेमिलें.

रा. रा. भिवराव आनंत माजी ना. तहशिलदार वाशीम यांना वाशीम येथेंच स्पेशल माजिस्ट्रेट नेमलें. व थर्डक्लासचा अधिकारही दिला.

आजपावेतों वऱ्हाडांत एक ऑडिशनल आ. सु. पोलीसची जागा होती ती मोडून हल्लीं फर्स्टग्रेड आ. सु. पोलीसच्या ४०० रु० पगाराच्या दोन व से. ग्रेड आ. सु. पोलीसची ३०० रु. पगाराची एक अशा तीन जागा केल्या. व त्याप्रमाणें मेसर्स फ्रेजर व हावसन साहेब यांस फर्स्टग्रेड व मि. विकाजी यांस से. ग्रेड नेमलें.

मि० हावसन साहेब यांना सर्वेव सेटलमेंट आफिसर नेमल्यामुळें मि. विकाजी यांना फ. ग्रेड व त्यांचे जागीं मि. क्राफर्ड साहेब यांना से. ग्रेड नेमिलें.

मि. मोफपाट साहेब यांचा दर्जा कमी केला होता परंतु त्यांना पुन्हा वणी जिल्ह्याचे डि. सु. पोलीस नेमल्याचें पाहून आह्मांस संतोष वाटतो.

देऊळगांव राजा येथील एक बातमीदार कळवितो कीं औरंगाबादेहून आलेल्या एका मारवाडणीनें टाकळखेड येथें पुरणा नदीचे काठीं पोट पाडून निवंत मुलास तसेंच टाकून नाहींशी झाली होती. पुढें तिला पोलिसांनीं पकडली व ती गुन्ह्यासही कबूल झाली.

मेहकर तालुक्यापैकीं जाहागीरदार सुलतानपूर येथील एक गृहस्थ तेथील शाळा मास्तर रा. रा. परशरामपंत चितळे यांनीं आपलें काम फार उत्तम प्रकारें केलें व हे फार सुस्वभावाचे आहेत परंतु यांची बदली होणार हें ऐकून हळहळ दाखवितो.

बुलठाणें येथलि एक बातमीदार असें कळवितो कीं येथील चीफ कान्स्टेबल पंडित लोचन सुकूल यांनीं देवीची आराधना वगैरे करून सिद्धि प्राप्त करून घेतली आहे. व ते आतां मंत्र सामर्थ्यानें अग्नि ही उत्पन्न करतात व त्या प्रमाणें त्यांनीं चालू महिन्यांत रा० रा० बापूजी हरी यांचे घरीं हावनाचे वेळीं प्रत्यक्ष अनुभव दाखविला वगैरे लिहितो.

वर लिहिलेली हकीकत खरी असल्यास मोठी आश्चर्य करण्या सारखी आहे.

ता. २४ संध्याकाळीं म्यु. क. भरली होती व ठराव झाला कीं पुरानें घरें पडली त्यांस मदत लोकांनीं ६५० रुपये वर्गणी नमा केली व म्यु. क. नें ५०० रु. भर घालावी.

## वर्तमानसार

बसलेल्या फिनान्स कमेटीच्या कारणानें कलकत्ता हायकोर्टांतही कांहीं काटकसर होईल असें दिसतें.

काशी सार्वजनिक सभेनें खर्च कमी करण्याच्या कामीं सरकारास आपले अभिप्राय कळविले आहेत असें समजतें. ह्या सभेनें ज्या सूचना केल्या आहेत त्यामध्यें "बोर्डआफरेव्हेन्यु" बंद करणें, जिल्हा जज्जांच्या जागा कमी करणें व पाद्री खात्याचा खर्च काढून टाकणें, ह्या सूचना फारच महत्वाच्या आहेत, व ह्यांकडे सरकारानें अवश्य लक्ष दिलेंच पाहिजे.

बोर्डआफरेव्हिन्यूच्या संबंधानें ह्या सभेचें असें ह्मणणें आहे कीं हें खातें बंद केल्यानें सरकारचा निव्वळ १९२५०० रुपयांचा फायदा होणार आहे. तें काम इलाख्यांतील निरनिराळ्या भागांचे कमिशनर व सरकारचे सेक्रेटरी यांजवर संपविलें असतां सहजीं होण्यासारखें आहे.

जिल्हा जज्जांचे कामतर बहुतकरून अपीलें तपासण्याचेंच असतें. दिवाणी अपीलें तपासण्याचें काम कांहीं सबार्डिनेट जज्जांचा अधिकार व पगार वाढवून त्यांजकडे संपविलें असतां होण्यासारखें आहे; व त्यांच्या फौजदारी कामाकरितां कांहीं फिरते जज्ज नेमावे, व ह्यांनीं जिल्ह्यांमधून फिरून वळोवेळीं तें काम पहावें. ह्या दोन्ही कृत्यांस सरासरी तीन लक्षांपेक्षां जास्त खर्च लागेलसें वाटत नाहीं. जिल्हा जज्जांच्या जागा बंद केल्यानें सुमारें पांच लक्ष रुपये शिलक राहणार आहेत, ह्यांतून वरील खर्चाचे तीन लक्ष रुपये वजा जातां सरकारचे दोन लक्ष रुपये शिलक राहतील. फौजदारी कामामध्यें जिल्हा जज्जांचे हातून चांगल्या प्रकारचा न्याय होतो खरा, परंतु दिवाणी अपीलें तपासतांना ह्यांच्या हातून पुष्कळदां अन्याय होतो. हायकोर्टांत त्यांच्या ठरावांवर अपील झालें असतां ह्यांचे ठराव फिरून अव्वल कोर्टांचें ठराव कायम झाल्याचीं शेंकडों उदाहरणें देतां येतील. तेव्हां योग्य नेटिव जज्जांस अपीलें तपासण्याचा अधिकार दिल्यानें रयतेसही एक प्रकारचें सुख होणार आहे.

मिशनरी किंवा पाद्री खात्याच्या संबंधानें सरकारच्या जमाबंदीपैकीं जो पैसा खर्च होतो तो न केल्यानें सरकारचे काम चालण्यास कोणत्याही प्रकारचा व्यत्यय येण्याचा संभव नाहीं. तशांत हें मिशनरी खातें असलेंच पाहिजे असें जर सरकारास वाटत असेल तर ज्या लोकांकरितां तें ठेवावयाचें त्याच लोकांवर त्या बद्दलचा खर्च बसला पाहिजे हें उघड आहे. ज्या लोकांचा ख्रिस्ती धर्माशीं कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं ह्या लोकांवर ह्या मिशनरी खात्याचा खर्च बसणें ह्मणजे फारच अन्यायाचें आहे. हा खर्च कमी केला असतां १७००००० रुपये वाचवितां येतात. तर एवढ्या मोठ्या बुडति खर्चाकडे सरकारचें ह्या चणचणीचे वेळीं लक्ष्य गेलें असतां पुष्कळच उपयोग होईल.

ह्या सभेनें अशाच प्रकारच्या पुष्कळ सूचना केल्या आहेत, त्या पैकीं वरील तीन सूचना आमच्या मतें फारच महत्वाच्या आहेत, व त्यांकडे सरकारचें आणि फिनान्स कमेटीचें लक्ष्य अगत्य गेलेंच पाहिजे. इकडील अशा प्रकारच्या सर्व सभांनीं वरील सभेचा कित्ता घेऊन सरकारास ह्या वेळीं खर्चाच्या बाबतींत ज्या वाटतील त्या योग्य सूचना जरूर केल्या पाहिजेत.

एडव्होकेट आफ इंडिया पत्रावरून कळतें कीं, सिमला, उटकमांड व महाबळेश्वर येथील वार्षिक सरकारी यात्रेप्रित्यर्थ सरकारास जो खर्च येतो तो हरतऱ्हेनें कमी करण्याबद्दल विलायत सरकाराकडून हिंदुस्थान सरकारास सूचना आल्याचें कळतें.

सिमला येथील फायनान्स कमिटीचे बहुतेक काम आटपलें असून कमिटीचे सभासद स्थानिक सरकारच्या खर्चाचे संबंधानें त्यांचे विचार काय आहेत हे समजावून घेण्याकारितां पुणें, मद्रास व अलहाबाद इत्यादि ठिकाणीं जाण्याकारितां येत्या महिन्यांत निघणार व प्रथम पुण्यास येणार.

ने० ओ०

भावनगरचे माजि दिवाण गौरीशंकर यांणी संन्यास घेतला, ह्मणजे गृहस्थाश्रम सोडून चतुर्थाश्रमी झाले. हे तिकडे मोठे नामांकित शहाणे असून त्यांस सी. एस. आय. हा किताब आहे. असल्या गृहस्थानें सन्यास घेतल्याचें हें पहिलेंच उदाहरण असावें.

हैदराबादेस एक चेंबर आफ कामर्स ह्मणजे व्यापाऱ्यांची सभा स्थापन होत आहे.

इताली देशांत पुष्कळ ठिकाणीं पटकीचा वाखा सुरू झाला आहे.

हिंदुस्थानांतील सरकारें दरसाल जीं हिमालयादी पर्वतांवर जात असतात त्या संबंधाच्या खर्चांत काटकसर करण्याविषयीं हिंदुस्थान सरकारास विलायत सरकारचा हुकूम झाला आहे असें सांगतात.

ब्रह्मदेशांत जी एक राजकन्या बंडावा करीत आहे तिच्यावर एका इंग्रजी फौजेनें हल्ला करून १३० लोक कैद केले, पण ती स्त्री निसटली गेली.

कलकत्याच्या स्टेटमन पत्राचा कर्ता अब्रु नुकसानी बद्दल हल्लीं सेशनकमिट झालेला असून त्याचा इनसाफ या महिन्याच्या कलकत्याच्या सेशनांत होणार आहे. या खटल्याचा इनसाफ स्पेशल जूरी नेमून व्हावा अशी फिर्यादीतर्फे ह्मणजे सरकार तर्फे कोर्टास विनंती करण्यांत आली व ती सेशन जज्जानें कबूल केली असें समजतें. हा प्रकार पाहून चमत्कार वाटतो. स्पेशल जूरी नेहमीं आरोपितांकडून मागण्यांत येते, पण याच खटल्यांत फिर्यादी तर्फे कां मागण्यांत आली हें समजत नाहीं.

विलायतेस लिबरल व कान्सरवेटीव असे जे दोन पक्ष आहेत त्यांतील दुसऱ्या पक्षाचा चालूनिवडींत जास्त भरणा होत आहे. ह्मणून आमचे कित्येक लोक दुःख करीत आहेत ते पाहूनही मोठा चमत्कार वाटतो. ग्लाडस्टन पक्ष हिंदुस्थानचे हित करणारा आहे आणि सालिसबरी पक्ष हिंदुस्थानास छळणारा आहे असें जे आमच्या पुढाऱ्यास वाटतें त्यांत कांहींच अर्थ नाहीं. हें दोन्ही पक्ष इंग्लंडचेच असून इंग्लंडचें हित दोघांसही लागलेलेंच आहे. ज्या जकातीमुळें हिंदुस्थानच्या गिरण्या बंद पडल्या आहेत ती जकात त्यांणी बंद केली काय? नेटिवांस व्हालंटीयर होण्याची परवानगी दिली काय? लष्करांतील मोठ्या जागा नेटिवांस देण्याचा ठराव का केला नाहीं? प्रजा व राजे लोक राजभक्त आहेत अशी जर खात्री झालेली आहे तर तो अति दुष्ट व हिंदुस्थानच्या लोकांस नपुंसक करणारा हत्यारांचा कायदा कां रद्द केला नाहीं? अगर त्यांत कांहीं कपेश तरी कां केला नाहीं? असल्या शेंकडो गोष्टी दाखवितां येतील कीं, ज्या दुरुस्त करण्यासारख्या असून त्या लिबरल कारभाऱ्यांनीं ही दुरुस्त केल्या नाहींत. कोणताही पक्ष राज्याधिकारी झाला तरी आम्ही अर्जवानेंच राहिलें पाहिजे आणि देतील त्या तुकड्यावरच संतुष्ट असलें पाहिजे.


## जाहिरात.

थोडे दिवसांत तयार.
सोहनी कृत.

### क्रिमिनल प्रोसिजर कोड
अथवा
### फौजदारी काम चालविण्याचा कायदा, सटीक.

सन १८८२ चा आकट १० सन १८८४ चा आकट ३ व १८८६ चा आकट १० या प्रमाणें दुरुस्त केलेला.

दुसरी आवृत्ति.
सुधारून वाढविलेली.

या पुस्तकाची पहिली आवृत्ति सुमारें तीन वर्षांपूर्वी मि० चिंतामण हरी सोहनी वकील यांनीं इंदुप्रकाशांत छापिली होती त्यावरून यांतील टिपांची उपयुक्तता सर्वांस माहीत आहेच.

यांत निवाडे कलकत्ता, मद्रास, मुंबई, व अलाहाबाद या चारी हैकोर्टांचे सन १८६२ पासून तों १८८६ जून अखेर पर्यंत येतील. शिवाय मुंबई हैकोर्टाची सरक्युलरें योग्य ठिकाणीं दाखल केली जातील.

प्रत्येक कलमाचा परस्पर पूर्वापार संबंध स्पष्ट रीतीनें दाखविला जाईल. व इतर आक्टांतील कलमांचा संबंध जियल्या तेथें स्पष्ट केला जाईल.

ह्या आवृत्तींत बडोदे संस्थान व वऱ्हाड व नागपूर येथील उपयुक्त फौजदारी सरक्युलरें व ठराव दिले जातील.

फक्त निवाड्यांची संख्या अजमासें १००० होईल. या शिवाय इतर समजुतीच्या टिपा येतील.

सोहनी यांचें याच विषयांवरील इंग्रजी पुस्तक हायकोर्टाचे जज्ज, बारिस्टर, वकील युरोपियन व नेटिव माजिस्त्रेट व पोलीस सुपरिंटेंडेंट यांनीं पसंत केलेलें आहे व तें त्यांचे वापरण्यांत आहे.

त्याचप्रमाणें मराठी पहिली आवृत्तिही लोकमान्य आहे.

या सर्व गोष्टींचा विचार करून ग्राहकांनीं इतर आक्टाच्या लांब यादीकडे लक्ष न देतां बुकाची योग्यता पाहून नंतर घ्यावें.

किंमत आगष्ट अखेर फक्त सही देणारास रु० ३॥ व टपाल हशील ९८ आणे. मागाहून किंमत ज्यास्त पडेल.

R. H. Karandikar
म्यानेजर ज्ञानप्रकाश.
'ज्ञानप्रकाश' छापखाना पुणें.

## "वऱ्हाड आईलमिल (तेलाची गिरणी) कंपनी लिमिटेड.

नोटीस.

वरील कंपनीच्या डिरेक्टरांची ता. १४ जुलई रोजी जी सभा झाली तींत असा ठराव झाला कीं प्रत्येक भागावर दुसरी मागणी २५ रुपयांची करावी व हे रुपये ता. ३१ जुलईचे आंत अगर तेदिवशीं मुंबईत हांगकांगशांघाय ब्यांकेंत अगर मुंबई ब्यांकची शाखा उमरावती येथील ब्यांकेंत भरावे. या तारखे बाहेर ज्या कडेस रकम राहील त्याजवर दरसाल दर शेंकडा ९ रुपये प्रमाणें व्याज आकरलें जाईल.

१९ चर्चगेट स्ट्रीट मुंबई ता. १९।७।८६ इ० — बोर्डाचे हुकुमावरून बनाजी कर्तृक आणि कंपनी म्यानेजर व एजंट

ASHU'S POWDER.

Perfectly cures the habit of drinking spirits and wines, opium-smoking, indigestion, dyspepsia, &c, by use as per instructions on label. Rs. 3 As, ~~8 per~~ phial. A. T. Mookerjee, Barnagore, *via* Calcutta. Wanted Agents.

THE GREAT ORIENTAL MEDICAMENTUM.
DR. G. B. SHAW'S SAMARITAN DROPS.

Rouses and developes the nervous energies, strengthens and regulates the stomach, bladder, kidneys, lungs and liver, and is highly recommended and prized as a sovereign remedy for the following maladies:-

Asthma, Shortness of breath Coughs Dropsy, Worms, Gravel, Chronic fevers, Liver complaint, Palpitation of the heart, Giddiness, Nervousness, Headache, Internal Sores, Phosphatic deposits and mucus in the urine, Gonorrhœa, Gleet, Fluor albus, Ulceration of the bowels, Chronic inflammation of the bladder, Catarrh.

By external application Dr. G. B. Shaw's Samaritan Drops is invaluable for:-

Burns, Ulcers, Malignant Sores, Ringworms, Itches, Tetters, Chilblains. Paralysis, Leprosy, Rheumatism, Gout Syphilitic Sores, and skin diseases of the worst description.

*Full directions for use accompany every phial.*

Sold at Re. 1, Rs. 2, Rs. 3-8, Rs. 5-4 and Rs. 10 per phial, packiag and postage As. 12. extra.

Wanted Agents, apply to
Barnagore Suburb of Calcutta *East Indies.* — A. T. Mookerjee, *Proprietor.*


☞ हें पत्र अकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडकेयांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० के०